एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

• मुंबई, बुधवार १३ मे, २०२० • वर्ष-९८, अंक-५१, पाने- ८, किंमत : ₹ ४

24x7 : www.enavakal.com • संपादक- सौ. जयश्री खाडिलकर-पांडे Email-navakal.1923@gmail.com

## २० वारकऱ्यांसोबत माऊलींची पालखी जाणार



**आळंदी -** आषाढी पालखी सोहळा वद्य अष्टमी म्हणजेच १३ जून रोजी करू नका, त्याऐवजी थेट आषाढ शुद्ध दशमी म्हणजेच ३० जून रोजी मोजक्या २० वारकऱ्यांसोबत माऊलींची पालखी पंढरपूरला न्या, असा पर्याय आळंदीच्या ग्रामस्थांनी सुचविला आहे.तसे निवेदन आळंदीकरांच्या सह्यांनिशी पंढरपूर देवस्थान दिले आहे. आता पंढरपूर देवस्थान याबाबत काय निर्णय घेणार यावर आषाढी पालखी सोहळा कसा होणार हे ठरणार आहे. दोन दिवसांपूर्वी आळंदी देवस्थानने आषाढी वारीसंदर्भात व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे चर्चा केली. यावेळी दिंडीकरी, फडकरी आणि वारकऱ्यांकडून सूचना मागविण्यात आल्या होत्या. माऊलींच्या पालखीसोबत सोहळा मालक, प्रमुख विश्वस्त, पालखी सोहळा प्रमुख , चोपदार, मानकरी , दिंडीकरी , शिपाई , टाळकरी , विणेकरी , पखवाज वादक , तुळस घेणारी महिला वारकरी आणि पुजारी असे मोजके वारकरी असतील .

# मुंबईहून पहिली प्रवासी ट्रेन सुटली

## १२०० प्रवाशांना घेऊन दिल्लीकडे

**केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने दिल्लीहून विविध शहराकडे १५ प्रवासी रेल्वे पाठविण्याचे जाहीर करताच काही तासात पुढील सात दिवसांचे आरक्षण झाले आणि ५४ हजार रुपयांची तिकिटे विकली गेली. या रेल्वेंच्या वेळापत्रकानुसार आज मुंबई सेंट्रलहून पहिली प्रवासी ट्रेन सुटली. जवळजवळ ४७ दिवसांनी हे आल्हादायक दृश्य सर्वांना दिसले.**



■ मुंबई

**आज** मुंबई सेंट्रल स्थानकावरून सायंकाळी ५.३० वाजता पहिली प्रवासी ट्रेन सुटली. सोशल विलगीकरणाचे नियम पाळावे लागत असल्याने या संपूर्ण ट्रेनमध्ये केवळ १२०० प्रवाशांना आरक्षण देण्यात आले होते. रेल्वे स्थानकावर आजच्या प्रवासासाठी जय्यत तयारी केली होती. संपूर्ण स्टेशन पुसून लख्ख करून सॅनिटाईज केले होते. शौचालये स्वच्छ केली होती. स्टेशनमध्ये शिरण्याच्या दाराबाहेर प्रवाशांनी विलग उभे राहावे यासाठी चौकोन आखले होते. प्रवाशांचे टेस्टिंग करून त्यांना प्लॅटफॉर्मवर सोडण्यात आले. प्रवाशासह कोणालाही प्लॅटफॉर्मवर जाण्यास मनाई होती. आज पहिली ट्रेन असल्याने गर्दी होईल हे लक्षात घेऊन बॅरिकेड लावले होते. आजपासून रोज ही ट्रेन सायंकाळी ५.३० वाजता दिल्लीला रवाना होणार आहे.

मुंबई सेंट्रल प्रमाणेच दिल्ली, बंगळुरू, अहमदाबाद, बिलासपूर, दिब्रुगड आदि स्थानकांवरून आज रेल्वे सुटल्या. या सर्व स्थानकांवरही निर्जंतुकीकरण करण्यात आले होते. ही सेवा सुरू झाल्याने हजारो जणांना दिलासा मिळणार आहे.

### लोकमान्य टिळक टर्मिनसवर मजुरांच्या ट्रेनसाठी रांगा

आज कुर्ला येथील लोकमान्य टिळक टर्मिनसवरून परप्रांतीय मजुरांसाठी श्रमिक स्पेशल ट्रेन निघाली. या ट्रेनसाठी जागा आरक्षित केलेल्या मजुरांना बेस्ट बसने स्थानकावर आणले जात होते. तिथे त्यांना विलग करून रांगेत उभे केले आणि एकेकाचे तिकिट तपासून त्यांना प्लॅटफॉर्मवर सोडले जात होते.

# २० लाख कोटींचे पॅकेज देताना कायद्यात मोठ्या बदलांचे सूतोवाच

■ नवी दिल्ली



**पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आज ४५ मिनिटांच्या भाषणात २० लाख कोटींचे आर्थिक पॅकेज जाहीर करताना जगाशी स्पर्धा करण्यासाठी कर प्रणाली व कायद्यात मोठे बदल केले जाण्याचे सूतोवाच केले. त्याचबरोबर नव्या नियमावलीसह १८ मे नंतरही लॉकडाऊन राहील हे स्पष्ट केले.**

गेले ४ दिवस जग कोरोनाशी मुकाबला करीत आहे. भारतात अनेकांनी आपले कुटुंबियातील कुणीतरी गमावले आहे. एका विषाणुने सर्व उलटपालट केले आहे. असे संकट यापूर्वी कधी ओढावले नव्हते. तरीही आपल्याला मजबुतीने हे संकट दूर करायचे आहे. अजूनही २१ वे शतक भारताचे असेल हे शक्य आहे. त्यासाठी स्वावलंबी भारत हा एकच मार्ग आहे. आपण संकटाला संधीत बदलायचे आहे.

अर्थकेंद्रित जागतिकीकरण विरुद्ध मनुष्यकेंद्रीत जागतिकीकरण यावर चर्चा सुरू आहे. स्वावलंबी होणे याचा अर्थ बदलत आहे. भारतात आपण सुखी जगाचा विचार करतो. जगाला विश्वास वाटू लागला आहे की, मानवजातीच्या कल्याणासाठी भारत देश खूप काही करू शकतो. आपण प्रगती करीत असतानाही विश्वकल्याणाचा विचार आहे. आजच्या संकटातही आपण अनेक देशांना मदत करीत आहोत.

आपल्याकडे तंत्रज्ञान आहे, आपल्याकडे कौशल्य आहे. आपण पुरवठा साखळी मजबूत करू शकतो. भारत स्वावलंबी बनू शकतो. अर्थकरण, दळणवळण, तंत्रज्ञानावर आधारीत व्यवस्था भुगोल आणि मागणी या पाच खाबांवर आपण हे स्वप्न पूर्ण करू शकतो, आपली पुरवठा साखळी यासाठी सशक्त करायची आहे.

स्वावलंबी भारत अभियानासाठी मी आर्थिक पॅकेज जाहीर करीत आहे. रिझर्व्ह बँकेने आधी जाहीर केलेली मदत धरून जवळजवळ २० लाख कोटींचे हे एकूण पॅकेज आहे. जीडीपीच्या १० टक्के इतके हे पॅकेज आहे. २०२० साली ही मदत गती देईल. जमीन, मजूर, शेतकरी, उद्योग, मध्यमवर्ग या सर्वांसाठी हे पॅकेज आहे. उद्यापासून वित्तमंत्री या पॅकेजची विस्ताराने माहिती देतील. या पॅकेजसह धडाडीचे बदल करणे आवश्यक आहे. पान ५ वर

# मोदी- शहा यांच्या मनात विष कालवले आणि माझ्या पाठीत खंजीर खुपसला

## भाजपाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसेंचा आरोप

■ मुंबई

**२०१४** मधील भाजपाचे मुख्यमंत्रीपदाचे दावेदार आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांना विधान परिषदेचे परिषदेची उमेदवारी न मिळाल्याने ते प्रचंड संतापले आहेत. आज एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत एकनाथ खडसे यांनी सांगितले की, माझी उमेदवारी कापण्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांची भाजपाच्या महाराष्ट्रातील नेत्यांना फूस होती, असे मला वाटत नाही. मात्र महाराष्ट्रातील दोन नेत्यांनी मोदी शहा यांच्या मनात माझ्याबद्दल विष कालवले आणि त्यांची दिशाभूल केली. त्यामुळेच मला अगोदर ठरलेले असतानाही उमेदवारी मिळाली नाही. माझ्या पाठीत खंजीर खुपसला. परंतु मी गप्प बसणार नाही, असा इशारा खडसे यांनी दिला.

एकनाथ खडसे यांच्या मुखातून आज अंगार बाहेर पडत होता. ते म्हणाले आपली खदखद व्यक्त करताना त्यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर कडाडून टीका केली. ते म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांना २०१४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी महाराष्ट्राचा प्रदेशाध्यक्ष मी बनविले. त्यावेळी ते माझ्या बंगल्यावर महिनाभर घिरट्या घालत होते. शेवटी गोपीनाथ मुंडे यांनी रदबदली केल्यामुळे मी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाला मान्यता दिली. त्यामुळे ते अध्यक्ष झाले. मात्र २०१४ च्या विधानसभेत विधानसभा निवडणुकीत भाजपाचे १२३ आमदार निवडून आणण्याचे श्रेय माझे आहे. त्यावेळी पक्षाकडे साधन सामग्री आणि पैसा नसतानाही विधान सभेचा विरोधी पक्ष नेता म्हणून मी संपूर्ण महाराष्ट्रभर फिरलो. दिवस-रात्र प्रचार केला आणि १२३ आमदार पान ५ वर

## बारामतीत पोलीस कॉन्स्टेबलची गळफास लावून आत्महत्या

■ बारामती

**बारामती** शहर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या एका पोलीस कॉन्स्टेबलने राहत्या घरात छताला दोरीने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना घडल्याने खळबळ उडाली आहे. तुषार सानप असे या आत्महत्या केलेल्या पोलीस कॉन्स्टेबलचे नाव आहे.

मृत तुषार सानप हे मागील तीन वर्षांपासून बारामती शहर पोलीस ठाण्यात कार्यरत होते. काल दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास सानप यांनी आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली.

त्यांच्या आत्महत्येचे नेमके कारण समजू शकलेले नाही. ते शहरातील पोलीस वसाहतीत राहत होते.



# आरोग्य सेतू अँपचे बंधन बेकायदा

## माजी न्यायमूर्ती श्रीकृष्ण यांचे मत

■ नवी दिल्ली

**सर्वोच्च** न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी . एन . श्रीकृष्ण यांनी केंद्र सरकारच्यावतीने सुरू केलेले आरोग्य सेतू हे अँप वापरण्यासाठी बंधन घालणे हे पूर्णतः बेकायदा असल्याचे मत यांनी व्यक्त केले आहे. या अँप ला कोणत्याही कायद्याची मान्यता नाही. असे असताना केंद्र सरकार आणखी कोणत्या कायद्यानुसार त्यासाठी बंधन लादत आहे असा संतप्त सवालही माजी न्यायमूर्ती श्रीकृष्ण यांनी केला आहे.

१ मे रोजी देशभरात लॉक डाउन वाढविल्यानंतर केंद्रीय गृह मंत्रालयाने आरोग्य सेतू अँप वापरणे हे खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचाऱ्याला अनिवार्य असल्याची घोषणा केली होती. हॉट स्पॉट झोनमध्ये तर त्याचा १०० टक्के वापर करायला लावण्याचे निर्दे श स्थानिक प्रशासकीय अधिकारी यांना दिले होते. यावर माजी न्यायमूर्ती श्रीकृष्ण यांनी असेही म्हटले आहे




की, सरकारने ज्या आधारावर या अँपची सक्ती सुरू केली आहे.त्याला सध्याच्या कोणत्याही कायद्याचे समर्थन मिळणार नाही. कायद्याचा हा एक तुकडा विशिष्ट कारणासाठीच पुढे करण्यात आला आहे. माझ्या मते 'राष्ट्रीय कार्यकारी समिती' ही काही एक वैधानिक शाखा नाही असेही श्रीकृष्ण यांनी म्हटले आहे.

दरम्यान, हे अँप न वापरणाऱ्यास १ हजार रुपये दंड किंवा ६ महिने कैद अशी शिक्षा नोएडा पोलिसांनी जाहीर करणे हे सुध्दा पूर्णतः बेकायदेशीर असल्यानचे मत माजी न्यायमूर्ती बी. एन. श्रीकृष्ण यांनी व्यक्त केले आहे.

## देवेंद्र फडणवीस सर्वात गरीब

**मुंबई-** मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काल विधानपरिषद उमेदवारीचा अर्ज भरताना १२५ कोटींची संपत्ती जाहीर केली. ते सर्वात श्रीमंत मुख्यमंत्री ठरले आहेत आणि देवेंद्र फडणवीस हे केवळ आठ कोटी ७१ लाखांची संपत्ती असल्याने सर्वात गरीब माजी मुख्यमंत्री ठरले आहेत.



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री शरद पवार यांची ३३ कोटी इतकी संपत्ती जाहीर आहे. तर सुशीलकुमार शिंदे ३८ कोटी, विलासराव देशमुख १२ कोटी, पृथ्वीराज चव्हाण १७ कोटी, नारायण राणे ८८ कोटी संपत्ती जाहीर केली होती.

# दिल्लीत मेट्रो सुरू करण्याची तयारी

## आरोग्य सेतू व मास्क लावणे अनिवार्य

■ नवी दिल्ली

लॉकडाऊन संपेपर्यंत बहुतांशी सार्वजनिक दळणवळण व्यवस्था सुरू होणार आहे. भारतीय रेल्वे सेवा काही प्रमाणात आजपासून सुरू करण्यात आली आहे. आता राजधानी दिल्लीतील मेट्रो सेवाही सुरू करण्याची तयारी सुरू झाली आहे. तसे संकेत दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनने दिले आहेत. दरम्यान, या मेट्रोतील प्रवाशांना आरोग्य सेतू अँप आणि मास्क अनिवार्य असणार आहे.



दिल्ली मेट्रोने आपल्या ट्विटर अकाऊंटवर म्हटले आहे की, मेट्रो स्थानकांमधील जे प्रशिक्षित सफाई कामगार आहेत. ते प्रवासी रहदारीचा परिसर साफ करतील. तसेच मेट्रो सेवा सुरू झाल्यावर प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी मेट्रो परिसरातील ईफसी गेट, लिफ्ट , इस्क्लेटर आदी मशीनच्या साफसफाई साठी विशेष स्टाफची नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, मेट्रोने प्रवास करताना संबंधित प्रवाशाच्या मोबाईलमध्ये आरोग्य सेतू अँप डाउन लोड करणे अनिवार्य राहणार असण्याची शक्यता आहे. तसेच प्रत्येक प्रवाशाला तोंडाला मास्क लावणे सक्तीचे राहणार आहे.

## हिंगोलीत कर्जबाजारी शेतकऱ्याची झाडाला गळफास लावून आत्महत्या

■ हिंगोली

**सर्वत्र** लॉकडाऊन असताना मात्र एका ४० वर्षीय कर्जबाजारी शेतकऱ्याने शेताच्या बांधावरील झाडाला गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यात घडली आहे. बबन लक्ष्मण कऱ्हाळे (४०) असे या आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.


बबन हे शेतकरी कळमनुरी तालुक्यातील दिग्रस कऱ्हाळे गावात राहत होते. त्यांच्या वडिलांच्या नावावर चार एकर शेती आहे. ते कुटुंबाची एकत्र शेती करायचे. शेतीसाठी आणि मुलीच्या लग्नासाठी त्यांनी २ लाखाहून अधिक कर्ज काढले होते. ते रविवारी रात्री

शेतात झोपायला गेले होते. सकाळी घरी आलेच नाहीत. त्यामुळे कुटुंबियांनी शोधाशोध केली असता बबन यांचा मृतदेह शेताच्या बांधावरील झाडाला लटकत असलेला आढळून आला.

# अनिल अंबानी कर्ज फेडण्यासाठी वीज कंपन्यांतील हिस्सा विकणार

■ मुंबई

**रिलायन्स** (एडीए ) समूहाचे प्रमूख अनिल अंबानी यांनी आपल्यावरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी आपल्या दोन वीज कंपन्यांतील हिस्सा विकण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी ब्रूकफिल्ड असेट्स मॅनेजमेंट, ग्रीनको एनर्जी, टोरंट पॉवर या कंपन्यासह एकूण ८ कंपन्या पुढे सरसावल्या आहेत.



अनिल अंबानी यांनी दिल्लीतील वीज वितरण करणारी बीएसईएस आणि यमुना डिस्कोम्स या कंपन्यातील हिस्सा विकण्याचा निर्णय घेतला आहे. केपीएमजीला खरेदीदार शोधून हा व्यवहार पूर्ण करण्याची जबाबदारी सोपवली आहे. अनिल अंबानी यांनी या दोन्ही कंपन्यांतील ५१ टक्के हिस्सा विकण्याचा निर्णय घेतला आहे.

सध्या अनिल अंबानी यांच्या रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीवर मोठया प्रमाणात कर्जाचा बोजा आहे. यापूर्वी ब्रिटनमध्ये पार पडलेल्या एका सुनावणीवेळी आपले नेटवर्थ शून्य असल्याचे म्हटले होते.

## ऑनलाईन दारूविक्रीला राज्यात परवानगी

**मुंबई-** महाराष्ट्र सरकारने आज ऑनलाईन दारूविक्री आणि दारूची घरपोच सेवेला परवानगी दिला आहे.



दारू विकत घेणाऱ्याकडे परमिट असणे आवश्यक आहे. त्याबरोबर घरपोच दारू पोचविणाऱ्याने मास्क लावणे सक्तीचे आहे.

## इचलकरंजी-सांगली रस्त्यावर परप्रांतीय मजुरांचा रास्तारोको

■ कोल्हापूर

**यड्राव** पार्वती क्षेत्रातील विविध कारखान्यांत काम करणारे परप्रांतीय मजूर गेले दोन महिने वसाहतीत अडकून पडले आहेत. कारखाने बंद असल्याने पगार नाही आणि खायला अन्न नाही, अशी त्यांची परिस्थिती आहे. आम्हाला गावी नेण्यासाठी वाहनांची सोय करा, अशी मागणी ते गेले अनेक दिवस करीत आहेत. आज मात्र त्यांचा संयमाचा बांध फुटला आणि हे हजारो कामगार इचलकरंजी सांगली रस्त्यावर उतरले. त्यांनी बसची मागणी करीत रस्ता अडवून धरला. त्यामुळे वाहने अडकून पडली. पण कामगार ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते.

## मुंबई पालिकेच्या महिला कर्मचाऱ्याचा कोरोनाने मृत्यू

**मुंबई-** महापालिकेतील आणखी एका कर्मचाऱ्याचा कोरोनाने मृत्यू झाला. काल रविवारी पालिकेच्या विकास व नियोजन विभागात शिपाई म्हणून काम करत असलेल्या एका महिलेचा कोरोनामुळे मृत्यू झाला. ही मृत महिला गोवंडी येथे राहत होती.त्या ३० एप्रिल पर्यंत कार्यालयात नियमित उपस्थित राहत होत्या. ५ मे रोजी त्यांना अस्वस्थ वाटू लागल्याने घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांना कोरोनाचे निधन झाले होते. मात्र उपचार सुरू असतानाच काल त्यांचा मृत्यू झाला.

## मातंग समाजाचे नेत्याचा वाशिममध्ये अपघाती मृत्यू

**वाशिम-** जिल्ह्यातील नंधाना येथील रहिवासी आणि मातंग समाजाचे नेते काशिराम उबाळे यांचा दुचाकीच्या अपघातात जागीच मृत्यू झाल्याची घटना चांडस-पांगरखेडा मार्गावरील शिरपूरनजीक आज दुपारी १२.३० वाजताच्या सुमारास घडली. उबाळे हे कामानिमित्त चांडस-पांगरखेडा मार्गाने दुचाकीने आज दुपारी शिरपूर येथे जात होते. त्यावेळी शिरपूरनजीक त्यांच्या दुचाकीचा अपघात झाल्याने त्यांच्या डोक्याला आणि डोळ्याला जबर मार लागला. यामध्ये त्यांचा घटनास्थळावर मृत्यू झाला.

## डॉ. मनमोहन सिंग यांना रुग्णालयातून सुट्टी

■ नवी दिल्ली

**माजी** पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना आज रुग्णालयातून सुटी देण्यात आली. छातीत त्रास होत असल्याने त्यांना दिल्लीतील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यानंतर त्यांची कोरोना चाचणीही करण्यात आली होती. चाचणीचा रिपोर्ट निगेटिव्ह आल्यानंतर त्यांना आज दुपारी १२.३० वाजता सुट्टी देण्यात आली.

माजी पंतप्रधान मनमोहन सिंग हे हार्ट पेशंट आहेत. यापूर्वी दोन वेळा त्यांची बायपास सर्जरी झाली आहे. १९९० मध्ये पहिल्यांदा इंग्लंडमध्ये त्यांची पहिली बायपास सर्जरी झाली होती. त्यानंतर २००४ मध्ये त्यांची अँजिओप्लास्टीही करण्यात आली होती. २००९ मध्ये पुन्हा त्यांना एम्समध्ये दाखल करण्यात आले होते. त्यावेळी ब्लॉक्ड आर्टरिज ओपन करण्यासाठी त्यांची आणखी एक बायपास सर्जरी करण्यात आली होती. याव्यतिरिक्त त्यांना मधुमेहाचा त्रासदेखील आहे.

## रत्नागिरीचा आकडा वाढला आणखी ५ रुग्ण आढळले

■ रत्नागिरी

**मुंबई** आणि पुण्याहून पास घेऊन रत्नागिरी जिल्ह्यात येणाऱ्यांची संख्या वाढली तरी जिल्ह्याची रुग्णसंख्या झपाट्याने वाढत आहे. आज आणखी ५ नवे रुग्ण सापडल्याने रुग्णांची संख्या ५२ झाली आहे. मुंबईहून दापोली आणि गुहागरला आलेल्यांचा नवीन रुग्णात समावेश आहे.

आज रत्नागिरीचे काही भाग सील करण्यात आले. बाहेरगावहून येणाऱ्या सर्वांना होम कॉरंटाईन सक्तीचे करण्याचाही विचार सुरू आहे. त्यातच लांजात ९ आणि १० वर्षांच्या दोघा मुलांना कोरोनाची लागण झाल्याचे उघड झाल्याने खळबळ माजली आहे.

### शुभराशी

३ ५ ७

# मुंबापुरीची होऊ शकते तुंबापूरी कोरोनामुळे नालेसफाई रखडली

■ मुंबई

**मुंबईतल्या** कोरोना संकटामुळे अत्यावश्यक असणाऱ्या मान्सूनपूर्व कामांचा वेग अत्यंत मंदावला आहे. मुंबईच्या नालेसफाईचे आणि मिठी नदीच्या स्वच्छतेचे काम अद्याप पूर्ण झाले नाही. महापालिकेने आतापर्यंत जी मान्सूनपूर्व कामे सुरु केली आहेत. त्यात प्रशासनाच्या म्हणण्यानुसार मिठी नदीतला केवळ २९ टक्के गाळ उपसण्यात आला आहे. पावसाळ्यापूर्वी ७० टक्के गाळ उपसण्याचे काम आवश्यक असते. उरलेले ३० टक्के काम हे पावसाळ्यात आणि त्यानंतर केले जाते. पावसाळा जवळ आला असून, राहिलेली नालेसफाई वेगाने करायची म्हटली तरी मुंबईतून कामगारांनी गावाकडची वाट धरली असल्याने नालेसफाईला कामगार आणायचे कुठून हा प्रश्न आहे. नालेसफाईची टेंडर मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात दिली गेली आहेत. मात्र, कंत्राटदारांना कामगारच मिळत नसल्यानेही नालेसफाईची कामे रखडली आहेत. तर पावसाळापूर्व उद्दिष्टाच्या २९ टक्के काम पूर्ण झाले आहे. दरम्यान मुंबई महापालिका आयुक्त इक्बाल चहल यांनी सोमवारी नालेसफाई आणि मिठी नदीतील गाळ काढण्याच्या कामाची प्रत्यक्ष स्थिती पाहण्यासाठी दौरा केला. पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण होईल याकडे लक्ष द्यावे. लॉकडाऊनच्या अडचणींवर मात करुन आपण कामांना गती देणे गरजेचे आहे. आता आवश्यक असल्यास अधिक संयंत्रे, मनुष्यबळ तैनात करावे. गरज असल्यास दोन सत्रांमध्ये काम पूर्ण करुन गाळ उपसण्याचे उद्दिष्ट नियोजित वेळेत गाठावे असे निर्देश त्यांनी दिले.

# रत्नागिरी जिल्ह्यातुन ५७८ मजूर पनवेलच्या दिशेने बसने रवाना

■ रत्नागिरी/प्रतिनिधी

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सध्या लॉकडाऊन सुरू आहे. लॉकडाऊनचा तिसरा टप्पा सुरू झाला आहे. मात्र लॉकडाऊनमुळे परराज्यातील अनेक मजूर ठिकठिकाणी अडकले आहेत. महाराष्ट्रातही असे हजारो मजूर अडकले आहेत. सध्या त्यांना त्यांच्या राज्यात जाण्यासाठी सरकारकडून विशेष व्यवस्था करण्यात येत आहे.. दरम्यान रत्नागिरी जिल्ह्यातही मध्य प्रदेशातील मजूर आपल्या गावी जाता यावे म्हणून वारंवार मागणी करत होते. अखेर या मजुरांसाठी पनवेल येथून ट्रेन सोडण्यात येणार आहे. त्यामुळे मजुरांना रत्नागिरी जिल्ह्यातून पनवेलपर्यंत जाण्यासाठी एसटीने सोय केली आहे. त्यासाठी रत्नागिरी जिल्ह्यात आज सकाळी ७ वाजल्यापासून ३० गाड्या सोडण्यात आल्या आहेत. यामध्ये रत्नागिरी, राजापूर, खेड, चिपळूण येथील डेपोतून बसेस सोडण्यात आल्या.

एका बसमध्ये २२ मजूर याप्रमाणे ३० गाड्या जिल्ह्यातून सुटत असल्याची माहितीही विभाग नियंत्रक सुनील भोकरे यांनी दिली आहे. पनवेल रेल्वे स्टेशन पर्यंत या गाड्या मजुरांना सोडून येणार आहेत.

# मानेसर येथील मारुती सुझुकीचा कारखाना सुरू

■ नवी दिल्ली

लॉकडाऊनमुळे देशातील सर्व उद्योगधंदे बंद असताना एक दिलासादायक बातमी आज आली आहे. ती म्हणजे देशातील सर्वात मोठी कार उत्पादक कंपनी म्हणून ओळखली जाणारी हरियानातील मानेसर येथील मारुती सुझुकीने आजपासून आपल्या या कारखान्यात मोटारींचे उत्पादन सुरू केले आहे. राज्य सरकारने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार या कंपनीने कामकाज सुरू केले आहे. हरियानातील मानेसरमधील कारचा कारखाना सुरू करण्याचा निर्णय मारुती सुझुकीने बुधवारी ६ मे रोजी घेतला होता. त्यानंतर हरियाणा सरकारने काही निर्बंध घातले व कारखाना सुरू करण्याची परवानगी दिली. त्यामुळे त्यावेळी कंपनीने त्याला नकार दिला होता. मात्र आता सरकारने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आजपासून मानेसर येथील कारखान्यातील कारचे उत्पादन सुरू केले आहे. कंपनी सुरू करायची झाली तर तिला पूरक इतर उद्योग आणि विक्रीची दुकाने सुरू होण्याची गरज आहे. परंतु यातील काही रिटेल दुकाने रेडझोनमध्ये असल्यामुळे ती सुरू करता येत नाहीत. त्यामुळे मागणीच नसेल तर उत्पादन करून काय उपयोग त्यामुळे कंपनीने यापूर्वी कारखाना सुरू करण्यास नकार दिला होता. परंतु आता काही रिटेल दुकाने सुरू झाल्याने कंपनीने कारचे उत्पादन आजपासून सुरु केले आहे. त्यामुळे वाहन क्षेत्राला मोठा दिलासा मिळाला आहे.



# पाहुण्यांना घरी बोलावले तर ११ हजार रुपये दंड आकारणार

■ गाझियाबाद

उत्तर प्रदेशमध्ये कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लोकांना शिस्त लावण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत. आता तर कोरोना काळात कोणी पाहुण्याला घरी बोलावले तर त्यांना ११ हजार रुपये दंड आकारला जाईल. तसेच वेळप्रसंगी संबंधित व्यक्तीच्या घराचा वीजपुरवठा तोडण्याचा इशारा देण्यात आला आहे. गाझियाबादमधील राजनगर एक्सटेन्शनची रिव्हर हाईट सोसायटी बाहेरून येणाऱ्या लोकांसाठी बंद केली आहे. या नियमाचा जो कुणी भंग करेल त्याच्यावर मोठा दंड आकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यांना ११हजार रुपये दंड केला जाणार आहे. दंड भरला नाही तर त्याचे वीजकनेक्शन तोडले जाईल. तसेच जर कोणला कोरोनाची लागण झाली तर संपूर्ण सोसायटी सील करण्यात येणार आहे.

# २६/११ हल्ल्यातील बेघर साक्षीदार उपचारासाठी रूग्णालयात दाखल

## माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांचा मदतीचा हात

■ कल्याण

**मुंबईवर** झालेल्या २६/११ दहशतवादी हल्लातील साक्षीदारापैकी एक असलेले हरिश्चंद्र श्रीवर्धनकर हे बेघर झाले असून त्याना रस्त्यावर जीवन जगावे लागत असल्याची माहिती काही दिवसापूर्वी समोर आली होती. त्यांना आता उपचारासाठी कल्याण येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांना माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी मदतीचा हात पुढे केला आहे. तसेच कल्याणमधील आयुष हॉस्पिटलमध्ये जाऊन त्यांची विचारपूस केली. अजमल कसाब या दहशतवाद्याने तुकाराम ओंबळे यांच्यासह निष्पाप लोकांचा जीव घेतला होता. या प्रकरणातील साक्षीदारांनी कसाब विरोधात साक्ष देऊन त्याला फासावर लटकावले. या साक्षीदारांपैकी एक असलेल्या हरिश्चंद्र श्रीवर्धनकर यांना हलाखीचे जीवन जगावे लागत आहे.

याची माहिती मिळाल्यानंतर रुग्णालयात जाऊन फडणवीस यांनी हरिश्चंद्र श्रीवर्धनकर यांच्याशी आणि त्यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधला. तसेच, श्रीवर्धनकर यांच्या उपचाराचा खर्च भाजप पक्ष करणार आहे, अशी घोषणा फडणवीस यांनी केली. भाजपतर्फे श्रीवर्धनकर कुटुंबीयांना १० लाखांचा मदत निधी देण्यात येणार असल्याचेही जाहीर केले आहे.

काही दिवसांपूर्वी ६० वर्षीय हरिश्चंद्र श्रीवर्धनकर मुंबईच्या रस्त्यांवर अत्यवस्थ अवस्थेत आढळून आले होते. जवळच असलेल्या दुकानदाराची नजर त्यांच्यावर पडली. त्यांनी हरिश्चंद्र यांची मदतही केली. हरिश्चंद्र श्रीवर्धनकर यांना कुटुंबियांनी घरातून बाहेर काढल्याची माहिती त्याना मिळाली. राहायला जागा आणि अन्न नसल्यामुळे हरिश्चंद्र गेले कित्येक दिवस मुंबईच्या रस्त्यांवर होते. दुकान मालक डीन डिसुजा यांनी त्यांची मदत केली. डिसुजा यांनी हरिश्चंद्र यांना पहिले तेव्हा त्यांनी प्रकृती खराब होती. त्यामुळे त्यांनी निराधारांसाठी असलेल्या स्वयंसेवी संस्थेत ठेवले.

२६/११च्या हल्ल्यात श्रीवर्धनकर जखमी झाले होते. दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात त्यांच्या पायाला दुखापत झाली होती. श्रीवर्धनकर हे अजमल कसाबला ओळखणार्या मुख्य साक्षीदारांपैकी एक होते. कसाब आणि त्याचा साथीदार अबू इस्माईल यांनी कामा हॉस्पिटलच्या बाहेर गोळीबार केला होता.

# नगर शहरातील वृद्ध महिलेला कोरोना

**नेवासा, प्रतिनिधी** – नगर शहरातील एका ७० वर्षीय महिलेला कोरोनाची लागण झाली आहे. त्यामुळे आता जिल्ह्यातील कोरोना बाधितांचा आकडा ५४ झाला आहे. या महिलेला सारी सदृश लक्षणे आढळल्याने तिला दोन दिवसापूर्वी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तसेच तिच्या घशातील स्त्राव तपासणीसाठी पाठविण्यात आला होता. आज सकाळी अहवाल प्राप्त झाल्यानंतर ही महिला कोरोना बाधित असल्याचे स्पष्ट झाले, अशी माहिती जिल्हा आरोग्य यंत्रणेने दिली. नगर शहरात गेल्या काही दिवसंपासून एकही रुग्ण आढळून आला नव्हता. आज पुन्हा शहरातील सुभेदार गल्ली भागात रुग्ण आढळल्याने प्रशासनाने तात्काळ या भागात प्रतिबंधक उपाययोजना करणे सुरू केले आहे.

जन्म. १२ मे

# सुप्रसिद्ध संगीतकार व गीतकार मिलिंद इंगळे



मिलिंद इंगळे या नावाबरोबर मराठी संगीत रसिकांच्या मनावर तरल भावपूर्ण आवाजाची झुळूक गारवा देऊन जाते. त्यांच्या गारवा हा सौमित्र लिखित गाण्याच्या अल्बमने बावीस वर्षांपूर्वी मराठी मनाला आल्हाद दिला त्याची मोहिनी आजही कायम आहे. मिलिंद इंगळे यांचे पणजोबा व आजोबा सांगली व इचलकरंजी संस्थानात दरबारी गायक होते. तर वडील पं. माधव इंगळे शास्त्रीय संगीतात निपुण. मिलिंद हे ग्वाल्हेर घराण्याची गायकी चालवणारे पाचव्या पिढीचे शिलेदार. आज जरी हे चित्र दिसत असले तरी ग्रॅज्युएट होईपर्यंत त्यांनी संगीताचे शास्त्रशुद्ध शिक्षण घेतलेले नव्हते. मिलिंद यांचे शालेय शिक्षण पुण्याला तर कॉलेज शिक्षण मुंबईत झाले. कॉलेजमध्ये संगीत स्पर्धांमध्ये त्यांनी भाग घेतला व बक्षिसेही मिळवली. पदवीनंतर मात्र त्यांनी संगीत क्षेत्रात काम करायचे निश्चि त केले व पं. यशवंतबुवा जोशी यांच्याकडे शास्त्रीय संगीताचे शास्त्रशुद्ध शिक्षण घेतले. गझल गायकीचे बारकावे, हरकती श्री.के.महावीर आणि श्री. राजकुमार रिझवी यांनी शिकवल्या.

आपण ऑर्केस्ट्रामध्ये गायचे नाही याबाबत ते ठाम होते. मात्र आठवणीतील गाणी, शब्दांच्या पलीकडले, आरोही अशा कार्यक्रमातून त्यांचे गाणे रसिकांच्या पसंतीला उतरत होते. आम्ही दोघे राजाराणी या चित्रपटातून नायकासाठी गाणी गाण्याची संधी त्यांना मिळाली. शब्दप्रधान हळुवार भावपूर्ण गाण्याची आवड. स्वतः संगीत देऊन अशी गाणी लोकांपुढे आणावी अशी त्यांची मनीषा होती. त्याचवेळी राजश्री प्रोडक्शनने संगीत क्षेत्रात काम करण्याचे ठरवले व मिलिंदजीना विचारणा केली. त्यांनी सौमित्र रचित कवितांची केलेली गारवा अल्बमची तयार गाणी त्यांना ऐकवली. मात्र राजश्रीला प्रथम हिंदी अल्बम करायचा होता. त्यामुळे मिलिंदजींनी ये है प्रेम हा अल्बम केला.त्यातील छुईमुईसी तुम लगती होहे गाणे लोकप्रिय झाले. त्यामुळे राजश्री प्रोडक्शनने गारवा करण्याचेही कबूल केले. गारवा ने तर इतिहासच रचला. यानंतर रसिया, सांजगारवा, सुर्यास्त हे अल्बम आले. २५/३० मराठी चित्रपटांत पार्श्वगायन केले. जुली, प्रारंभ, गोजिरी, यमाच्या गावाला जाऊया, प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं या चित्रपटांचे संगीत, इंद्रधनुष्य, २२, गेट वेल सून, मेरी सहेली अशा मालिकांची शीर्षकगीते ,डॉटर या हिंदी चित्रपटाला संगीत,व हनन या हिंदी चित्रपटात पार्श्वगायन असा प्रवास चालूच राहिला. आज विलेपार्ल्यात त्यांची म्यूजिक अँड सोल ही संगीत अकादमी आणि सुसज्ज स्टुडिओ नवीन कलाकारांना संगीत शिक्षण देत आहे.

*संजीव वेलणकर, पुणे,*

१२ मे १९७८

# ‘डॉन’ हा अमिताभ बच्चन यांची दुहेरी भुमिका असलेला तुफान गाजलेला चित्रपट

‘डॉन’ हा हिंदी चित्रपटांच्या इतिहासातील एक अप्रतिम चित्रपट म्हणून ओळखला जातो. ह्या चित्रपटाचे निर्माते होते नरीमन इराणी व दिग्दर्शक होते चंदर बोराटे. चंदर बोराटे यांनी पूर्वी मनोजकुमारचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम केले होते.

चित्रपटामधील गाणे ‘खैई के पान बनारस वाला . . ’ आणि हेच गाणे अमिताभच्या बेधूंद अदाकारीने एवढे प्रचंड गाजले व त्यामुळेच प्रेक्षक चित्रपटाकडे परत खेचला गेला व हा चित्रपट तुफान चालला!

असे म्हणतात या गाण्याच्या शूटींगला अमिताभ बच्चन ला तीस चाळीस वेळा पाने खावी लागली होती, त्यामुळे नंतर अमिताभ बच्चनचे चांगलेच तोंड आले व नंतर दहा पंधरा दिवस अमिताभला नीट खाताही येत नव्हते. या चित्रपटाबद्दल अमिताभला फिल्मफेअर ॲवार्डही मिळाले, पण ते ॲवार्ड व त्याचे पैसे अमिताभ बच्चनने नरीमन इराणींना श्रद्धांजली म्हणून त्यांच्या मिसेसला डोनेट केले. (निर्माता नरीमन इराणी यांचे या चित्रपटाच्या शूटींग दरम्यानच निधन झाले होते.)

आजही अमिताभला त्यांचे जे चित्रपट आवडतात त्यामध्ये पहिल्या दहामध्ये ते या चित्रपटाची गणना करतात !

मुंबईतील अंडरवर्ल्डची पार्श्वभूमी असलेली ‘डॉन’ची कथा विजय या पात्राभोवती फिरते. विजय हा मुंबईच्या झोपडपट्टीत राहणारा एक साधा इसम आहे. मात्र तो हुबेहूब डॉन या बड्या गुंडासारखा दिसतो. डीएसपी डीसिल्व्हा (इफ्तेकार) या पोलीस अधिकाऱ्याच्या सांगण्यावरून तो डॉनचे रुप घेण्यात तयार होतो. असे करून तो पोलिसांचा खबऱ्या बनणार असतो आणि त्यातून पोलिसांना या गँगची पाळेमुळे खणून काढण्यास मदत होणार असते.

अमिताभ बच्चन आणि झीनत अमान यांच्या बरोबरच प्राण, इफ्तेकार, हेलन, ओम शिवपुरी आणि सत्येन कप्पू यांच्या भूमिकाही विसरता येणार नाहीत. या सगळ्यांच्या दमदार अभिनयामुळे डॉन हा १९७८ मध्ये तिकिटबारीवर सर्वाधिक चाललेला चित्रपट ठरला होता. या चित्रपटामुळे अप्रतिम फॅशनही पाहता आली. बेल बॉटम्स, पोलका डॉट्स आणि रंगीत चश्मे. ये मेरा दिल आणि खइके पान बनारसवाला यांसारखी कल्याणजी आनंदजी यांची अप्रतिम गाणी, अप्रतिम ॲक्शन कधीही विसरता येणार नाही असा अप्रतिम डायलॉग..डॉन को पकडने की कोशिश ११ मुल्कों की पोलीस कर रही है, लेकीन डॉन को पकडना मुश्कील ही नहीं नामुमकीन है.




**‘डॉन’ चित्रपटाबद्दल काही रंजक गोष्टी**

- **‘खइके पान बनारसवाला’ हे गाणे खरेतर देव आनंद यांच्या ‘बनारसी बाबू’ या चित्रपटासाठी लिहिले गेले होते.**
- **अमिताभ बच्चन या च्या विजय या व्यक्तिरेखेचा लूक संजीव कुमार यांनी ‘नया दिन नयी रात’ या चित्रपटात केलेल्या भूमिकेपासून प्रेरित आहे.**
- **चित्रपटातील मुख्य पार्श्वसंगीतातील एका तुकड्यासाठी कल्याणजी आनंदजी यांनी बेरी व्हाईटच्या १९७४च्या क्लासिक टुगेदर ब्रदर्स थीम वापरली होती.**

# लॉकडाऊन दरम्यान स्थलांतरित गरजूंना धान्य देणार का? मुंबई उच्च न्यायालयाचा राज्य सरकारला सवाल

■ मुंबई

**कोरोना** महामारीच्या या काळात रेशन कार्ड नसलेल्या परंतु स्थलांतरित गरजूंना राज्य सरकार भारतीय खाद्य महामंडळाकडून अतिरिक्त धान्य देणार का? अशी विचारणा मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारकडे केली आहे. लॉक डाऊनच्या काळात गरजू व स्थलांतरितांना धान्य मिळावे यासाठी पुण्याच्या वनिता चव्हाण यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यावरील सुनावणी न्यायमूर्ती एस.सी. गुप्ते यांच्यापुढे सुरू आहे.

कोरोना महामारी च्या पार्श्वभूमीवर देशात सुरू असलेल्या लोक डाऊन मुळे सर्व उद्योगधंदे आणि व्यवहार ठप्प झाले आहेत त्यामुळे स्थलांतरित मजुरांना कसल्याही प्रकारचे काम मिळत नाही व हातात मजुरीही पडत नाही म्हणूनच अशा रेशन कार्ड नसणाऱ्या स्थलांतरित आणि भटकणाऱ्या आदिवासी आणि मजुरांना अन्नधान्य पुरविण्याचे निर्देश न्यायालयाने राज्य सरकारला द्यावेत अशी मागणी विनीत चव्हाण यांनी विनिता चव्हाण यांनी एका याचिकेद्वारे मुंबई उच्च न्यायालयात केली होती. या याचिकेत न्यायालयाला कळविण्यात आले आहे की, राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यात समाविष्ट नसलेल्या नागरिकांची गरज पूर्ण करण्यासाठी संबंधित योजनेअंतर्गत फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाकडून अतिरिक्त अन्नधान्य द्यावे, असे आदेश केंद्र सरकारने सर्व राज्य सरकारना व केंद्रशासित प्रदेशांना दिलेले आहेत. त्याची अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी याचिकेद्वारे करण्यात आली आहे.

या याचिकेवर आपले मत नोंदविताना सर्वोच्च न न्यायालयाचे न्यायमूर्ती एस. सी. गुप्त यांनी सांगितले की, कोरोना व्हायरस या साथीच्या आजारांमुळे राज्यात निर्माण झालेली विचित्र आणि भीषण परिस्थिती तसेच लॉक डाऊनचा विचार करता राज्य सरकारने यावर निर्णय घेणे अनिवार्य आहे. याबाबत राज्य सरकारने लवकरात लवकर निर्णय घ्यावा, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

# अमेरिकेत कोरोनाचा कहर सुरूच आतापर्यंत ८१ हजार ७९५ जणांचा बळी

■ न्यूयार्क

अमेरिकेमध्ये कोरोना व्हायरसचा कहर सुरूच आहे. त्यामुळे अमेरिका मोठ्या संकटात आली आहे तेथे कोरोनाने आतापर्यंत ८१हजार ७९५ जणांचा बळी घेतला आहे तर १३ लाख ८५ हजार ८३४ जणांना कोरोनाची बाधा झाली आहे. त्यामुळे तेथील नागरिकांमध्ये मोठे भीतीचे वातावरण पसरले आहे. संपूर्ण जगभरात कोरोनामुळे आतापर्यंत २ लाख ८७ हजार ३३२ जणांचा मृत्यू झाला आहे. स्पेन, युके, रशिया, इटली, फ्रान्समध्ये देखील कोरोनाने धुमाकूळ घातला आहे. स्पेनमध्ये २ लाख २८ हजार १४९ जणांना कोरोनाची लागण झाली आहे. तर तेथे आतापर्यंत २६ हजार ७४४ जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच युकेत ही काहीशी अशीच परिस्थिती आहे तेथे आतापर्यंत कोरोनाने ३२ हजार लोकांचा जीव घेतला असून २ लाख २३ हजार ०६० जणांना कोरोना झाला आहे. रशियात २ लाख २१ हजार ३३४ जणांना कोरोनाची लागण झाली असून तेथे २ हजार ००९ जणांना कोरोनाने मृत्यू झाला तसेच इटलीत कोरोनामुळे आतापर्यंत ३० हजार ७३९ लोकांचा बळी गेला असून फ्रान्समध्ये २६ हजार ६४३ जणांचा मृत्यू झाला आहे.

# जिल्हा रुग्णालयात काम करतोय रोबो

■ रत्नागिरी, प्रतिनिधी – कोरोनानं जगात हाहाकार उडवला आहे. कोरोना रुग्णांमुळे सध्या आरोग्य यंत्रणेवर ताण पडत आहे. दरम्यान रत्नागिरी जिल्हा रुग्णालयात आता आरोग्य यंत्रणेच्या मदतीला एक रोबो आला आहे. रत्नागिरी जिल्हा शासकीय रुग्णालयातल्या कोरोना विभागात रोबो काही प्रमाणात आरोग्य यंत्रणेची कामं करत आहे. रत्नागिरीचे जिल्हाधिकारी लक्ष्मीनारायण मिश्रा यांच्या कल्पनेतून हि कल्पना सत्यात उतरली आहे. या कल्पनेला मूर्त स्वरूप दिलंय रत्नागिरीचे रहिवासी संजय वैशंपायन यांनी. वैशंपायन यांनी तयार केलेल्या रोबोमुळे आता वॉर्डबॉय अथवा डॉक्टरांना पेशंटच्या जवळ न जाताच औषध पोहचवणे, माहिती घेणे, जेवण पोहचवणे शक्य झालं आहे.

# दुष्काळी खटाव तालुक्याला कोरोनाचा डंख

**वडूज, प्रतिनिधी** – खरशिंगे (ता खटाव) येथील एका वीस वर्षाच्या युवकाचा अहवाल पॉझेटीव्ह आल्याने औंध परिसरात खळबळ उडाली आहे. बाधित रुग्ण आपल्या आईवडीलासह ठाणे येथून दुचाकीवरून गावाकडे खरशिंगे येथे प्रशासनाला चकवा देऊन आले होते. त्यानंतर त्या कुटुंबाला गावानजीकच असणाऱ्या त्यांच्या घरात होमः क्वारंटाईनमध्ये ठेवण्यात आले होते. काल या कुटुंबातील वडीलांना थोडा त्रास जाणवू लागल्याने त्यांनी दुचाकीवरून सातारा गाठले होते. सातारा येथील क्रान्तीसिंह नाना पाटील शासकीय रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करून कुटुंबातील तिघांचे स्वॅब घेण्यात आले होते.

# नाकाबंदी चौकीवर कर्तव्यावर असलेल्या शिक्षकाला सिमेंटच्या भरधाव ट्रकने चिरडले


■ सांगली

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने घेतलेल्या लॉकडाउनच्या निर्णयाची राज्यांकडून काटेकोरपणे अंमलबजावणी केली जात आहे. कोरोना व्हायरसचा प्रसार रोखण्यासाठी राज्य आणि जिल्ह्यांच्या सीमाही बंद करण्यात आल्या असून, मालवाहतूक सुरू आहे. या वाहनांची तपासणी करण्याचे काम पोलिसांकडून केले जात आहे. सांगली जिल्ह्यातील डफळापूर येथे नाकाबंदी चौकीवर पोलिसांसोबत कर्तव्यावर असलेल्या शिक्षकाला भरधाव ट्रकने चिरडल्याची घटना काल सोमवारी मध्यरात्री घडली. याप्रकरणी ट्रक चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

सांगली जिल्ह्यातील डफळापूर येथे नाकाबंदी चौकी तयार करण्यात आली आहे. या ठिकाणी वाहनांची तपासणी करण्याचे काम पोलिसांकडून केले जात असून, मालवाहतूक करणाऱ्या वाहनांमधून नागरिक धोकादायक पद्धतीने प्रवास करणार नाही, याची काळजी घेतली जात आहे. या पोलिसांना सहाय्य करण्यासाठी राज्य शासनाने शाळेतील शिक्षकांची मदत घेण्याचा निर्णय घेतला आहे. डफळापूर शाळेत कार्यरत असलेले शिक्षक नाना कोरे हे नाकाबंदी चौकीवर होते. कर्तव्यावर असताना कर्नाटकातून सिमेंट घेऊन एक ट्रक येत होता. पोलिसांनी हा ट्रक शिंगणापूर नाक्यावर थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र, चालकाने ट्रक थांबवला नाही. त्यानंतर पोलिसांनी ट्रकचा पाठलाग सुरू केला. यात जत तालुक्यातील डफळापूर नाकाबंदी ठिकाणी ट्रक चालकाने शिक्षकालाच जिवंत चिरडले. यात शिक्षक नाना कोरे जागीच ठार झाले. घटनेनंतर पोलिसांनी ट्रक चालकाला ताब्यात घेतले आहे.

नवा काळ
मुंबई बुधवार दि. १३ मे २०२०

## दिनविशेष




**1956** आध्यात्मिक गुरु **श्री श्री रविशंकर** यांचा जन्म.

**1962** **डॉ. राधाकृष्णन** भारताचे दुसरे राष्ट्रपती झाले.

**1648** **दिल्लीतील लाल** किल्ल्याचे काम पूर्ण झाले.

**1951** - भारतीय संगीतकार आणि दिग्दर्शक **आनंद मोडक** यांचा जन्म.



**2001** सुप्रसिद्ध लेखक **आर. के. नारायण** यांचे निधन.

# सोशल मीडियावर 'मेकयुअरमास्क' स्पर्धा

## मास्क वापरण्यासाठी व्हिस्टाप्रिंटचे प्रोत्साहन


जास्तीत जास्त लोकांनी फेस मास्क वापरावेत या उद्देशाने डिजिटल प्रिंटिंगमध्ये अग्रेसर असलेल्या व्हिस्टाप्रिंटने सोशल मीडिया माध्यमांद्वारे 'मेकयुअरमास्क' स्पर्धेचे आयोजन केले आहे. व्हिस्टाप्रिंट स्पर्धकांना त्यांची सर्जनशीलता वापरण्यास तसेच भविष्यात ते मास्कवर कोणती डिझाइन ठेवू इच्छितात ते शेअर करण्यास प्रोत्साहित करत आहे. सर्वाधिक प्रभावी डिझाइनच्या निर्मात्यास ब्रँडकडून पर्सनलाइज्ड मास्क जिंकण्याची संधी मिळेल. प्रि-प्रिंटेड मास्कनंतर व्हिस्टाप्रिंटने पोर्टफोलिओचा विस्तार करताना पर्सनलाइज्ड मास्क हे नवे उत्पादन सादर केले आहे. पर्सनलाइज्ड मास्क हे इमेज, टेक्स्टला सपोर्ट करतात तसेच काही सोप्या टप्प्यांमध्ये ते तयार करता येतातत. हे मास्क किफायतशीर, टिकाऊ असून धुण्याजोगे तसेच पुन्हा वापरण्यायोग्य आहेत. या स्पर्धेच्या माध्यमातून हा ब्रँड समाज संरक्षण आणि भारतासाठी निर्मितीचा आनंद आणि उत्साहवर्धक वातावरण तयार करण्यास कटिबद्ध आहे.




**व्हिस्टाप्रिंट इंडियाचे सीईओ**

सध्याच्या काळात स्वतःला आणि आपल्या माणसांना सुरक्षित ठेवण्यास प्राधान्य दिले पाहिजे. सार्वजनिक ठिकाणी मास्क घालण्यास प्रोत्साहित केल्यापासून, त्याबाबत अनेक गंमती होत आहेत. एखादा संदेश देण्यासाठी किंवा आपली ओळख परिधान करण्यासाठी ते पर्सनलाइज्ड केले जात आहे. पर्सनलाइज्ड मास्क आणि या स्पर्धेमुळे लोक मास्क घालण्यास अधिक प्रोत्साहित होतील, असा आम्हाला विश्वास आहे. - **भरत शास्त्री,**
सीईओ व्हिस्टाप्रिंट इंडियाचे

# हा पहा जगाचा 'आखरी रास्ता'






प्रत्येक गोष्टीला जशी सुरुवात असते, तसाच त्याला अंतही असतोच. कुठलाही रस्ता घ्या, त्याला जोडून दुसरा रस्ता असतोच. पण... जगात एक रस्ता असाही आहे, ज्याच्या पुढे दुसरा रस्ताच नाही. म्हणजेच तो या जगाचा 'आखरी रास्ता' आहे असंच म्हणावं लागेल. उत्तर ध्रुवावर (नॉर्थ पोल) 'ई-६९' नावाचा हा रस्ता जगातला शेवटचा रस्ता आहे. त्याच्या अलीकडे नॉर्वे आहे तर पलिकडे पृथ्वीचे टोक आहे. म्हणजेच त्या रस्त्याच्या पुढे कुठलाच रस्ता नाही. तेथून पुढे नजर जाईल तेथे फक्त समुद्रच आहे.


'ई-६९' हा एक हायवे आहे. त्याची लांबी जवळपास १४ किलोमीटर आहे. या हायवेवर अशी काही ठिकाणे आहेत, जेथे एकट्याने पायी किंवा कारनेही जायला मनाई आहे. अनेकजण एकत्र जात असतील तरच तेथे परवानगी मिळू शकते. कारण या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना बर्फाचे मोठमोठे थर आहेत. त्यात एकटा माणूस हरवण्याची शक्यता असते. उत्तर ध्रुव जवळच असल्याने तेथे थंडीचा ऋतू आणि रात्री संपतच नाहीत. उन्हाळा आला तर बरेच दिवस सूर्य मावळतच नाही. कधी कधी तर सहा सहा महिने सूर्य दिसतच नाही. हिवाळ्यात येथील तापमान उणे-४३ एवढे असते. उन्हाळ्यात तापमान खूपच प्रचंड असते.

असं विचित्र हवामान असलं तरी येथेही काही लोक राहात आहेतच. १९३० पासून येथे विकास होऊ लागला. पर्यटकांना हे अनोखे ठिकाण दाखवण्याचा येथे व्यवसायच सुरू झाला. त्यामुळे आता तेथे रेस्टॉरंट्स, लहान मोठी हॉटेल्स सुरू झाली आहेत. आता तर जगातून तेथे येणाऱ्या पर्यटकांची संख्या खूपच वाढली आहे. तेथे एक वेगळेच जग असल्याचा भास हेतो. येथे सूर्यास्त आणि पोलर लाइट्स पाहण्यासारखे असते. येथे निळ्या आकाशात कधी हिरव्या, तर कधी गुलाबी रंगाचा प्रकाश पाहायला मिळतो. पोलर लाइट्सला येथे 'ऑरोरा' असेही म्हटले जाते.



# पार्कला लागली विचित्र आग...





एकदा आग लागली की त्यात सगळं जळून भस्म होतं. अगदी सुक्याबरोबर ओलंही जळतं. काही काही म्हणून शिल्लक राहात नाही. पण कॅनडामध्ये एका पार्कमध्ये आग पसरत असल्याचा एक व्हिडीओ सध्या चांगलाच वायरल होतोय. तो पाहून कुणीही चकीत होईल. कारण या व्हिडीओत आग हळूहळू पार्कमध्ये पसरत असल्याचं दिसतंय, पण या आगीत गवत, मोठी झाडे आणि एवढंच नाही, तर लाकडी बेंच या कशालाही न जाळता पुढे पुढे जातेय. कमाल आहे ना...

हा व्हिडीओ पाहून आश्चर्य वाटते. आपण एखाद्या सिनेमातला व्हीएफक्स सीन तर पाहात नाही ना अशीही शंका येते. पण हा पार्कही खरा आहे आणि त्यातली आगही खरीच आहे. हा व्हिडीओ सर्वप्रथम क्लब डी मोंटाना कॅल्होरा नावाच्या एका स्वयंसेवी संस्थेने आपल्या फेसबुक पेजवर टाकला होता. त्यानंतर तो अनेकांनी ट्विटरवरही अपलोड केला. तेथे ही पोस्ट ६५ लाख लोकांनी पाहिली आहे. यातला एक युजर म्हणतो, मोठी आज्ञाधारक आग आग आहे, अशी आग मी कधी पाहिली नव्हती. त्यातल्याच एका युजरने त्यामागचे कारण सांगितले. तो म्हणतो, मी त्याच भागात राहातो. बिर्च नावाची ही झाडं कापसासारखा एक खास प्रकारचा पांढरा पदार्थ बनवतात. तो गवतावर चिकटून बसतो. तो घालवण्यासाठी हाच उपाय योजतात. स्थानिक प्रशासनच आग लावून तो पदार्थ हटवत आहेत.

## खाजवा डोके

विमलने आपल्यासोबतच्या व्यक्तीची ओळख करून देताना सांगितले की, 'ह्यांचे मामा माझ्या मामाला मामा बोलतात' तर विमल व ती व्यक्ती यांचे नाते कोणते ?

# वय वर्षे फक्त १० वजन २०० किलो





फास्टफूड, नुडल्स असलं काहीबाही खाण्याची आवड बहुतेक सर्वच तरुणांना असते. आईबाबाही मुलांना बाहेरचे फास्ट फूड आणून देतात आणि मुलांचं रडणं थांबवतात. पण यामुळे मुलांना तसल्या पदार्थांची मग चटकच लागते. जास्त फास्ट फूड खाण्याने शरीरातील इम्युनिटी कमी होऊ लागली आहे. त्यामुळे विषाणू शरीरावर सहज हल्ला करू शकतात. फास्ट फूडचा असाच दुष्परिणाम इंडोनेशियात एका १० वर्षांच्या मुलाला भोगावा लागतोय. नुडल्स खाल्ल्यामुळे त्याचं वजन तब्बल २०० किलोपर्यंत वाढले आहे. या मुलाला नुडल्स इतके आवडते की तो फक्त तेच खात होता. त्यामुळेच त्याचं वजन २०० किलोवर गेल्याचं डॉक्टर म्हणतात. त्याला आता चालणंही शक्य होत नाहीये. खूप वजन वाढल्यामुळे ते कमी करण्यासाठी त्याच्यावर एकदा शस्त्रक्रिया करावी लागली आहे. पण ही शस्त्रक्रिया केल्यावरही या मुलाचे वजन कमी झालेले नाही. आता या मुलाने नुडल्स खायचे सोडले आहे, तरीही त्याचे वजन जैसे थे आहे.

## हसा लोको

***दुकानदार:*** *आमच्या टूथपेस्टमध्ये तुलसी, कापूर, निलगिरी, लवंग आहे..*

***बंड्या :*** *नक्की काय करायचं आहे ब्रश करायचं का तोंडात यज्ञ करायचांय..*

***स्थळः*** *सदाशिव पेठ, पुणे.*

***जोशीकाका :*** *काय तात्या, आज अगदी आनंदात दिसता आहात ! काय झालं ?*

***तात्या :*** *अहो, आमच्या शेजारच्या कुलकर्ण्यांना १ लाख रुपयाची लॉटरी लागलीये !*

***जोशीकाका :*** *मग तुम्हाला का इतका आनंद झालाये ?*

***तात्या :*** *त्याला आता तिकिट सापडत नाहीये !*

*डॉक्टर (इंजिनीअरिंगच्या विद्यार्थ्याला) : तुमची १ किडनी फेल झाली आहे.*

*विद्यार्थी आधी खूप खूप रडला...., मग डोळे पुसत बोलला RECHECKING मध्ये निघेल का??*

## हे माहित आहे का ?

### राज्यातील प्रमुख नद्या व उपनद्या (बॉक्स तयार करणे)

| मुख्य नदी | राज्यातील लांबी | प्रमुख उपनद्या |
|---|---|---|
| गोदावरी | ६६८ किमी | वर्धा, वैनगंगा, प्रवरा, मांजरा, दारणा, सिंधफणा, दक्षिणपूर्णा |
| तापी | २०८ किमी | पूर्णा, गिरणा, वाघूर, पांझरा, वान, काटेपूर्णा, मोरना |
| भीमा | ४५१ किमी | इंद्रायणी, मुळा, मुठा, पवना, नीरा, कऱ्हा, सीना, कुकडी, बोर, माण, पुष्पावती |
| कृष्णा | २८२ किमी | पंचगंगा, वारणा, कोयना, वेण्णा, येरळा, दूधगंगा, वेदगंगा |
| वर्धा | ४५५ किमी | वेमला, निरगुडा, विदर्भा, कार, बोर, नंद, इरई |
| वैनगंगा | २९५ किमी | कन्हान, पेंच, चूलबंध, गाढवी, नाग, जांब, अंधारी |
| पैनगंगा | ------ | कयाधू, पूस, अडाण, वाघाडी, खुनी |
| इंद्रावती | ------ | बांदिया, अकेरा, डोंगरी |
| मांजरा | ------ | तेरणा, लेंडी, मन्याड, तावरजा |
| नर्मदा | नंदुरबारच्या उत्तर सीमेवरून ५४ किमी | तवा ही उपनदी आहे. |



# डर्टी चायचा ट्रेण्ड आला

काहीच दिवसांपूर्वी लोकांमध्ये डालगोना कॉफीचा ट्रेण्ड आला होता. तेव्हा ती कॉफी सगळेच प्यायला लागले होते. बनवू लागले होते. तसाच आता 'डर्टी चाय'चा ट्रेण्ड आला आहे. हे नाव जरा विचित्र वाटत असलं तरी लोकांमध्ये आणि विशेषतः चहाच्या शौकिनांमध्ये हा चहा विशेष प्रसिद्ध झाला आहे. तो कसा बनवायचा त्याची रेसिपीही खूप वायरल झाली आहे. गंमत म्हणजे कॉफी शॉपमध्येही ती उपलब्ध असते. हा चहा म्हणजे लॅटे आणि चहाचे अनोखे मिश्रण आहे. मसाला ब्लॅक टी, गरम दूध आणि एस्प्रेसो शॉटसह हा डर्टी चाय तयार केला जातो.

ज्यांना स्ट्राँग कॉफी आवडत नाही, त्यांना हा चहा नक्की आवडेल. हा चहा स्मुथ आणि मिल्की असतो. त्यामुळे यात चहा आणि कॉफी दोन्हीचा फ्लेवर एकत्र पाहायला मिळतो. त्यात डबल एस्प्रेसो शॉट मिसळून तो आणखी स्ट्राँग बनवला जाऊ शकतो. यात आले, काळीमिरी, दालचिनी पावडर, वेलची आणि काही लवंगाही घालता येऊ शकतात. या प्रकारच्या चहाला एस्प्रेसो चाय, रेड आय चाय, चाय चार्जर, जावा चाय, टफ गाय चाय अशाही नावांनी संबोधले जाते. तो कोल्ड आणि हॉट अशा दोन्ही स्वरूपात मिळू शकतो. कोल्ड टी साठी त्यात बर्फ टाकला जातो.



## ही घ्या याची रेसिपी...

एक वा दोन चमचे चहा पावडर गरम पाण्यात टाकून ते उकळून घ्या. त्यात तुमच्या आवडीनुसार आले, काळीमिरी, दालचिनी पावडर, वेलची किंवा काही लवंगा यापैकी काय हवं ते एक टाका. मग त्यात दोन शॉट्स एस्प्रेसो मिसळा. आता त्यात गरम दूध घालून चमच्याने चांगले एकजीव करा. बस, डर्टी चाय तयार...



## डर्टी चायचे फायदे...

या प्रकारच्या ब्लैक टीमध्ये अॅन्टीऑक्सिडेंट तत्त्वे असतात. त्यामुळे शरीरातील रोग प्रतिकारक शक्ती वाढते. त्यामुळे अर्थातच कुठल्याही आजाराशी लढायची ताकद प्राप्त होते.

**डायबिटीज टाईप-२च्या रुग्णांसाठी तर डर्टी चाय वरदान ठरू शकेल. कारण या प्रकारच्या चहामुळे त्यांच्या शरीरातील ब्लड ग्लुकोजचे प्रमाण संतुलित राहाते.**

डर्टी चायमुळे शरीरातील ब्लड प्रेशर नियंत्रणात राहाते. यातील पोटॅशियम शरीरात रक्त वाहून नेणाऱ्या पेशींना आराम मिळतो. या चहामुळे बॅड कॉलेस्ट्रॉलही नष्ट होतो.

**या चहामधील एस्प्रेसोमुळे स्मरणशक्ती वाढण्यास मदत होते, तर अल्प स्मरणशक्ती असलेल्यांनाही या चहामुळे बराच फरक पडलेला दिसून येतो.**

यातील कॅफीनमुळे शरीर ताजेतवाने राहण्यास मदत होते. या कॅफीनमुळे शरीरातील बऱ्याच कॅलरीज बर्न होऊ शकतात.

**एसप्रेसो शॉट्स भुकेवर नियंत्रण ठेवतात. त्यामुळे जास्त खाण्याची इच्छाच होत नाही. परिणामी लठ्ठ माणसांचा जाडेपणा हळूहळू कमी होतो.**

डर्टी चायमधील मोडरेट एस्प्रेसोमुळे प्रोस्टेट कॅन्सरचा धोका टाळता येऊ शकतो.



लॉकडाऊन सुरू होण्याच्या आधी म्हणजे १६ मार्चला गुजरातमधील बडोद्याला माहेरी गेलेली अभिनेत्री **प्रार्थना बेहरे** मोठ्या कष्टाने मुंबईला पतीजवळ परतली आहे. त्यासाठी परवानग्या मिळवण्यासाठी तिला खूप त्रास झाला. तिचा हा प्रवास नेमका कसा झाला हे जाणून घेऊया...

# सुदैवानेच घरी परतले

**प्रार्थना, पुन्हा मुंबईत आलीस... तुझं स्वागत... पण नेमकी गेलीस का होतीस तिकडे?**

- त्याचं असं झालं की १६ मार्चला मी माहेरी बडोद्याला गेले. कारण त्याच दिवसांत सिनेमागृहे बंद झाली होती. चित्रपट रिलीज होणार नव्हते. म्हणून म्हटलं माहेरी जाऊन दोन तीन दिवसांत पाडव्यापर्यंत परत येईन. मी ड्राईव्ह करून बडोद्याला गेले. माझा डॉगीही माझ्यासोबत होता. मग कळलं अचानक... लॉकडाऊन सुरू झालंय. यामुळे मी तिकडेच अडकले.

**मग परतायची तयारी कशी सुरू केलीस?**

- माझं आणि माझा पती अभिषेक जावकर, आमचं दोघांचंही मत होतं की जेव्हा मला परत यायचं असेल तेव्हा प्रॉपर परमिशन घेऊनच यायचे. कसलाही आडकाठी आम्हाला नको होती. मला २ तारखेला एक व्हिडीओ आला. महाराष्ट्रातले जे लोक वेगवेगळ्या राज्यांत अडकले आहेत त्यांच्या परत येण्याची महाराष्ट्र सरकारने व्यवस्था केली होती ते त्यात कळलं. गुजरात सरकारही लोकांना पाठवायला तयार होते. म्हणून मग आम्ही लगेच कामाला लागलो. अभी मुंबईतून काय होतंय बघत होता, तर मी बडोद्याहून... मला कळलं की डिजीटल गुजरात नावाची एक वेबसाईट आहे त्यावर नोंदणी करावी लागते. तसं मी केलं. २ तारखेला अर्ज केला आणि ३ तारखेला मला परवानगी मिळालीही. पण त्यात लिहिलं होतं की बॉडी स्क्रिनिंग केल्यावरच तुम्ही एका राज्यातून दुसऱ्या राज्यात जाऊ शकाल. त्यामुळे मी जवळच्या हॉस्पिटलमध्ये जाऊन पूर्ण बॉडी चेकअप केलं. तेव्हा मला तसं प्रमाणपत्र मिळालं. माझ्या डॉगीसाठी मला वेटर्निटी डॉक्टरची परवानगी घ्यावी लागली. मग मी तिच्यासाठी पिंजरा आणला. त्यातून तिला आणलं.

**घरच्यांची प्रतिक्रिया काय होती?**

- घरी बडोद्याला सगळे काळजीत होते की, ७ तास मी मोटार ड्राईव्ह करून एकटी कशी जाणार म्हणून... पण मी ठरवलंच होतं की काहीही करून परत जाणारच. मला कुणी ड्रायव्हरही मिळाला नाही. त्यामुळे मीच ड्राईव्ह करणं भाग होतं. मधे दोनदा मला थांबवलं पोलिसांनी... आधी वापीला आणि मग वलसाडला... महाराष्ट्राच्या बॉर्डरवर मात्र मला दीड तास थांबावं लागलं. तेथे पुन्हा बॉडी चेकअप झालं. ताप नाही ना तपासलं. सगळी कागदपत्रे पाहिली गेली आणि मग मला पुढे प्रवास करायला मिळाला.

**महाराष्ट्र पोलिसांबद्दल काय अनुभव आला?**


- महाराष्ट्राच्या सीमेवर मी दीड तास रांगेत होते. तेव्हा मी पोलिसांचं काम प्रत्यक्ष पाहिलं. अक्षरशः उन्हात उभे राहून ते प्रत्येकाला तपासत होते, कागदपत्रे पाहात होते. कमाल आहे त्यांची... अक्षरशः सलाम करावासा वाटतो त्यांना... या सगळ्याचे फोटोही मी फेसबुकवर टाकले आहेत. बघा. वाटेत मी अनेक मजूरही पाहिले. पण त्यांना मी माझ्या मोटारीत घेऊ शकले नाही. तशी परवानगी नव्हती मला. असो... सुदैवाने अखेर घरी परतले.

# श्वेता तिवारी माझा आदर्श




सोनी टीव्हीवरील 'मेरे डॅड की दुल्हन' या मालिकेद्वारे अंजली ततरारी हिने छोट्या पडद्यावर पदार्पण केलंय. या मालिकेत श्वेता तिवारी (गुनीत सिक्का) आणि वरुण बडोला (अंबर शर्मा) यांच्या प्रमुख भूमिका असून अंजली यात निया या व्यक्तिरेखेत दिसते आहे. अलीकडेच टीव्ही क्षेत्रात प्रवेश करूनही अंजलीने या भूमिकेसाठी पारितोषिक मिळवले आहे. तरीही श्वेता तिवारी याच आपला आदर्श असल्याचं ती सांगते. गंमतीशीर स्वभावाची अंजली सेटवर श्वेता आणि वरुणसोबत धमाल करताना दिसते. त्या दोघांशीही तिचे छान जमते आणि या दोन्ही जेष्ठ अभिनेत्यांकडूनही तिला दरवेळी प्रोत्साहन, प्रेम, आपुलकी तसेच बऱ्याचदा कौतुकाची थापही मिळते. अंजलीने नुकताच इन्स्टाग्रामवरील तिच्या अकाऊंटवर स्वतःचा कादंबरी वाचत असतानाचा फोटो शेअर केला होता आणि त्याखाली, 'मी पुस्तक वाचतेय... ओळखा पाहू यामुळे कोणाला अभिमान वाटणार आहे' असे कॅप्शन दिले होते आणि श्वेता तिवारीनेही तिला 'प्राऊड ऑफ यू' म्हणत तिला दाद दिली आहे.

# ललित प्रभाकरचे वर्क फ्रॉम होम!




लॉकडाऊन असल्यामुळे शूटिंग बंद आहे. कलावंत घरीच बसले आहेत. पण नेहमी कामात मग्न असणारे कलाकार घरातही स्वस्थ बसत नाहीतच. ललित प्रभाकर हाही त्यातलाच आहे. त्याने घरात बसूनच वर्क फ्रॉम होम सुरू केले आहे. त्याने मराठमोळा अभिनेता चिराग पाटील याच्या साथीने घरातूनच एका लघुपटाचे चित्रीकरण केले. लॉकडाऊनमध्ये घराबाहेर पडणे किती घातक ठरू शकते ते या लघुपटातून ललित आणि चिराग यांनी दाखवले आहे. ललित प्रभाकरने नुकताच हा व्हिडीओ सोशल माध्यमांवर पोस्ट केला आहे. या व्हिडीओखाली ललित कॅप्शनमध्ये म्हणतो, एकटा राहणं चांगलं का? लॉकडाऊनमध्ये एकमेकांच्या साथीने केलेले हे एक चांगले काम... ललित लवकरच 'मिडीयम स्पायसी' या सिनेमातून प्रेक्षकांसमोर येणार आहे, तर चिराग पाटील रणवीर सिंहच्या '83' या हिंदी सिनेमात दिसणार आहे.

# प्रसादच्या केसांचे रहस्य उलगडले!



करोना संकटामुळे सर्वसामान्य नव्हे, तर सेलिब्रेटीजसुद्धा लॉकडाऊनमध्ये आहेत. हाच वेळ ते आपल्या कुटुंबियांसोबत घालवत आहेत. यातलेच काहीजण घरातूनच नवनवीन कल्पना लढवून भन्नाट आयडियाज काढत आहेत. अभिनेता, दिग्दर्शक प्रसाद ओकही याला अपवाद नाही. त्याने नुकत्याच पोस्ट केलेल्या एका व्हिडीओमुळे त्याच्या चाहत्यांची दांडीच गुल झाली. प्रसाद ओकने चक्क त्याच्या वाढलेल्या केसांचा व्हिडीओ शेअर केलाय... त्याखाली कॅप्शनमध्ये प्रसाद म्हणतो, केस कापायचेत... वाढलेत ना? पण वेळच मिळत नाही हो सध्या... गंमत म्हणजे हे प्रसादचे खरे केस नव्हेत... तर हे सोशल मिडीयावरचे ॲनिमेटेड व्हर्जन प्रसादने आपल्या चेहऱ्यावर चढवलंय. प्रसादचे ते रूप पाहून त्याच्या चाहत्यांना हसू फुटलेय. हे चाहते त्याला कमेंट्स टाकून 'दादा धमाल केलीत...' असे सांगत आहेत.

# जितेंद्र जोशीचे पोलिसांसाठी गाणे



'सेक्रेड गेम्स' या वेबसिरीजमध्ये काटेकरची भूमिका साकारणारा अभिनेता जितेंद्र जोशी आता रॅपर म्हणून समोर आला आहे. सध्या लॉकडाऊनची स्थिती असताना देशातील पोलीस, डॉक्टर्स आणि इतर कर्मचारी जीव धोक्यात घालून काम करत आहेत. या वॉरियर्सना सॅल्यूट करणारे एक रॅप साँग जितूने आणले आहे. विशेषतः या परिस्थितीत सतत तैनात असलेल्या भारतीय पोलिसांसाठी जितेंद्र जोशीने हे रॅप साँग लिहिले आहे. समीत कक्कड यांनी याचे दिग्दर्शन केलेले आहे. त्याला डब शर्माचे संगीत लाभले असून आणि जितेंद्र जोशीनेच ते गायलंदेखील आहे. विशेष म्हणजे घरातच राहून हे गाणं चित्रीत करण्यात आले आहे. या रॅप साँगमधून पहिल्यांदाच जितेंद्र जोशीचा रॅपर अंदाज पाहायला मिळाला आहे. 'थोडी इज्जत दिखा, एक सैल्युट तो मार, पुलीसवाला भी है इंसा, वो भी पडता बीमार...' असे या रॅप साँगचे शब्द आहेत. 'सेक्रेड गेम्स' या वेबसिरीजमध्ये काटेकर पोलिसाची भूमिका करणारा जितेंद्र जोशी लवकरच 'बेताल' या आगामी वेबसिरीजमध्येही एका वेगळ्या भूमिकेत दिसणार आहे.

# अब्बास-मस्तानच्या वेबसिरीजमध्ये शर्मन



अभिनेता शर्मन जोशी लवकरच 'पेंटहाऊस' नावाच्या एका सायकॉलॉजिकल वेबसिरीजमधून प्रेक्षकांसमोर येतोय. बॉलीवूडमधील अब्बास आणि मस्तान ही प्रसिद्ध दिग्दर्शक जोडीच ही वेबसिरीज सादर करणार आहे. लॉकडाऊनमुळे ही सिरीज रिलीज व्हायला उशीर होतोय, पण मिळालेल्या माहितीनुसार, अब्बास मस्तान पुन्हा एकदा आपला प्रिय थ्रिलर जॉनर घेऊन परत येत आहेत. या वेबसिरीजमध्ये शर्मन जोशी मुख्य भूमिकेत असेल. एप्रिलच्या सुरुवातीलाच या वेबसिरीजचे शूटिंग सुरु होणार होते, पण लॉकडाऊनमुळे चित्रीकरण सुरू व्हायला उशीर झाला आहे. ही सिरीज नेटफ्लिक्सचा ओरिजिनल कंटेट आहे. शर्मनने 'बारिश' या वेबसिरीजमधून यापूर्वीच डिजीटल डेब्यू केला आहे. आता तर त्या वेबसिरीजचा दुसरा सीझनही आला आहे.

# सोनू सुदची सामाजिक बांधिलकी, ३५० मजुरांना गुलबगार्ला पोहोचवले!



राज्यात अडकून पडलेल्या मजुरांच्या मदतीसाठी अभिनेता सोनू सुद धावला आहे. सोनूने गुलबर्गा येथे जाण्यासाठी ३५० मजुरांसाठी १० बसची व्यवस्था केली आहे. काल ठाण्याहून या बसेस सोडण्यात आल्या आहेत. सोनूने स्वतःच्या खिशातून ८ लाख रुपये खर्च करत ही मदत केली आहे. महत्त्वाचे म्हणजे हे मजूर इच्छित स्थळी पोहोचेपर्यंत त्यांच्या खाण्यापिण्याची सोय देखील त्याने केली आहे. यापूर्वी देखील त्याने मजुरांसाठी जेवण्याची व्यवस्था केली आहे.

# मला अटक झालेली नाही, मी घरातच सुरक्षित!



काल रात्रीपासून मला अटक झाल्याच्या बातम्या समोर येत आहेत. पण मला अटक वगैरे झालेली नाही. मी घरातच आहे आणि सुरक्षित आहे असे पुनम पांडे हिने म्हटले आहे. आपल्या ऑफिशियल इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन तिने यासंदर्भातला एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. या व्हिडीओतच तिने आपण घरातच आहोत असे म्हटले आहे. अभिनेत्री आणि मॉडेल पूनम पांडे हिच्यावर विनाकारण रस्त्यावर फिरत असल्याने लॉकडाऊनचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आल्याच्या अफवा येत होत्या.

# ६ मिनिटांच्या ॲक्शन सीनसाठी खर्च होणार ६ कोटी!



अल्लु अर्जुनचा आगामी पुष्पा हा सिनेमा आतापासूनच चर्चेत आहे. या सिनेमाच्या ६ मिनिटांच्या ॲक्शन सीनसाठी तब्बल सहा कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. या चित्रपटाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे हा पूर्णपणे मेड इन इंडिया सिनेमा असणार आहे. टेक्नीशियन आणि एक्सपर्ट हे सगळेच भारतीय असणार आहेत. कोरोनाच्या संकटातून सावरल्यानंतर आपल्या देशातील अधिकाधिक लोकांना काम मिळावे हा यामागचा हेतू आहे. चित्रपट व्यापार विश्लेषक तरण आदर्श यांनी ही माहिती दिली आहे.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

## संपादकीय

# नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# नया भारतची जुनी पायपीट

**तब्बल** पावणेदोन महिन्यानंतर परप्रांतीय मजूरांच्या प्रवासासाठी सोयी उपलब्ध झाल्या. याचा अर्थ लॉकडाऊन जाहीर करताना सामान्य माणसाचे प्रश्न विचारात घेतले गेले नाही हे स्पष्ट होते. वारंवार ज्या नया भारतचे कौतुक पंतप्रधान मोदींकडून केले जात होते त्या नया भारतमधल्या जुन्या समस्या किती खोलवर पोहचल्या आहेत हे या लॉकडाऊनने दाखवून दिले. सर्व काही आलबेल आहे. देश प्रगतीच्या दिशेने घौडदौड करीत आहे. जनधन योजना, आयुष्यमान योजना उज्ज्वला गॅस योजना अशा योजनांचा नुसता भडीमार करून प्रगतीचे चित्र वारंवार रंगवले गेले. या सगळ्या सोयीसुविधा जर सामान्य माणसाला दिल्या जात असतील तर मग हा हातावर पोट भरणारा रोजंदार माणूस इतक्या व्यथित परिस्थितीत आपल्या गावाकडे का निघाला. असा प्रश्न उपस्थित होतो. शहरात त्याला मिळणारा रोजगार किंवा सरकारकडून दिली जाणारी मदत जर त्याच्यासाठी खरोखरच आधार ठरली असती तर त्याला मैलोन मैल रस्ते तुडवत गाव गाठण्याची गरजच वाटली नसती. अक्षरशः देशाच्या विविध भागात लाखोंच्या संख्येने हे कामगार गावाकडे जाताना पाहायला मिळाले. त्यांचे हे जथ्थेच्या जथ्थे पाहिल्यावर देशभरातील गरीबी रेषेखालच्या लोकांचे जीवन किती कष्टमय आहे. हे तर सगळ्या जगाने पाहिलेच. परंतु आजही इतक्या प्रचंड संख्येने ही सामान्य जनता जगण्यासाठी रोज संघर्ष करत असल्याचे स्पष्ट होते. आज कोरोनासारख्या महामारीविरुध्द लढण्यासाठी योध्दे हवे आहेत. परंतु रोजच्या जगण्याची ही महामारी डोक्यावर घेऊन या देशातील लाखो कामगार रोजच आपल्याच आयुष्याशी युध्द करीत असतात. त्यांच्या जीवनाची ही फरफट कोरोनामुळे अधिक प्रखरतेने समोर आली. सरकारसाठी सामान्य माणसाचे हे प्रश्न किंवा जगण्यासाठी चाललेली धडपड फार मोठा धडा ठरते.

**विकासाचे भुसभुशित चित्र**

राज्यकर्त्यांच्या डोळ्यात अंजन घालण्यासारखी ही परिस्थिती आहे. आपण समजतो. तितकी देशाची परिस्थिती चांगली नाही. देशाची ३० ते ४० टक्के लोकसंख्या अशा हलाखीचे जीवन जगते. दरवर्षी सादर होणारे अंदाजपत्रत त्यात गरीबांच्या कल्याणासाठी दाखवली जाणारी अब्जावधी रुपयांची आकडेमोड ही किती फसवी आहे. हेदेखील यानिमित्ताने स्पष्ट होते. त्यामधून सामान्य मजुरांची केवळ गरीबीची परिस्थितीच समोर आली असे नाही तर त्यांची निरक्षरता आणि जगण्यासाठी आवश्यक असलेल्या किमान सुविधांपासूनही ते किती मैलोन मैल दूर आहेत यानिमित्ताने प्रकाशझोत आलेला आहे. शहरात राहून आपल्याला आता पैसे मिळणार नाहीत. कारण शहरातील त्यांचे रोजचे जगणे हे त्या दिवशी मिळणाऱ्या रोजगारावरच चालत असते. प्रत्येक दिवस त्यांच्यासाठी कसोटीचाच असतो. पण लॉकडाऊन जारी झाल्यानंतर हातातला रोजगार गेल्याची भावना त्यांच्यात पसरली. आणि एका निराशेने त्यांना ग्रासले. जगण्याचे प्रश्न समोर उभे राहिले. कोरोनापेक्षाही रोजची रोजीरोटी कशी मिळेल असाच प्रश्न उभा ठाकला. सरकार आपल्याला काही देऊ शकणार नाही. याची त्यांना पूर्ण खात्री असल्याने हा मजूर रस्ता दिसेल तसा चालत सुटला. आपल्या आयुष्यात त्याने कधीही सरकारी मदतीची अपेक्षा केलेली नसते. काबाडकष्ट करायचे. आपल्या श्रमाच्या जोरावर जगण्याचा प्रयत्न करायचा. हेच त्याच्यासाठी स्वाभिमानाचे जगणे असते. लॉकडाऊनच्या काळात मदतीची शक्यता नाही. हे त्याने ताबडतोब ओळखले. आणि आपला आपला मार्ग स्वीकारला. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच देशातील असा मजूर वर्ग शहरं सोडून आपल्या गावाकडे स्थलांतरित झाला असावा. विशेष म्हणजे त्याची संख्याही थोडीथोडकी नाही. निदान कोरोनाच्या निमित्ताने जर या स्थलांतरीत किंवा हातावर पोट भरणाऱ्या मजूरांच्या जीवनकळा सरकारी यंत्रणांपर्यंत पोहचल्या तर फार बरे होईल. दुर्दैवाने अनेक गोष्टी राज्यकर्ते आणि सरकारी यंत्रणांना उशिरा लक्षात येतात. अगदी आतासुध्दा गावाकडे निघालेल्या या मजुरांना तातडीने वाहन व्यवस्था उपलब्ध करून द्यावी याचासुध्दा कोणत्याच सरकारला तातडीने निर्णय करता आलेला नाही. निम्म्यापेक्षा जास्त अंतर पायपिट करून झाल्यानंतर आता बसेस आणि रेल्वेची सोय केली जात आहे.

**कर्नाटकप्रमाणे आर्थिक मदत द्या**

आपण नेहमीच जगातल्या मोठमोठ्या देशांबरोबर आपली तुलना करीत असतो. अमेरिका, इंग्लंड, रशिया, चीन यांच्यासारखी प्रगती आपल्याला करायची आहे. त्यांच्यासारखेच इथले जनजीवन झाले पाहिजे. विकसित देशांप्रमाणेच इथे स्मार्ट सिटीज आल्या पाहिजेत. बुलेट ट्रेन आणून देशाची प्रगती कशी वेगात आहे. याला आपण महत्व देत असतो. परंतु या सगळ्या गोष्टी किती भुसभुशीत असल्याचे हालअपेष्टा सोसणाऱ्या या मजुरांच्या पायपिटीने दाखवून दिले. केवळ विकासाचे बुजगावणे उभे करून देशाचे संरक्षण किंवा राजकारण करता येणार नाही. त्याकरीता हा गरीब आणि अतिशय सामान्य माणूस विकासाचा केंद्रबिंदू ठरवावा लागेल. मग अगदी लॉकडाऊन लागू करताना कोरोना रोखण्यापेक्षाही या सामान्य माणसाची परिस्थिती काय असेल याचा आधी विचार झाला पाहिजे. लॉकडाऊन उठवतानासुध्दा सरकारच्या मनात आले आणि लॉकडाऊन उठवले असे होता कामा नये. शहरं सोडून गेलेला हा मजूर पुन्हा शहरांकडे कसा येईल. देशभर शेतीचे झालेले नुकसान कसे भरून निघेल. छोट्या छोट्या शहरांमध्ये काम करणारे धोबी, न्हावी, भाजी विक्रेते असे कितीतरी व्यावसायिक आहेत की ज्यांना आर्थिक टंचाईला तोंड द्यावे लागते आहे. अशा सर्वांचाच लॉकडाऊन उठवतानासुध्दा विचार व्हायला हवा. यासंदर्भात कर्नाटक सरकारने घेतलेला निर्णय महत्वाचा ठरतो. असे रोजंदार स्वरुपाचे कामगार आणि छोटे व्यावसायिक या सर्वांना पाच हजारापासून ते पंधरा हजारापर्यंतची आर्थिक मदत राज्य सरकार देणार आहे. यासाठी १६ हजार ५०० कोटी रुपयांची विशेष तरतूदही त्यांनी केली आहे. अशाच प्रकारची मदत केंद्रानेदेखील केली पाहिजे. तरच यादेशातील सामान्य नागरिकाला पुन्हा नव्याने उभे राहाण्याकरीता थोडाफार हातभार मिळू शकेल. नया भारत असे म्हणत असताना जरा या जुन्या पायवाटेची दखल सरकारने घेतली पाहिजे.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११


जीवनात हार कधीच मानू नका, कारण पर्वतामधून निघणाऱ्या नदीने आजपर्यंत रस्त्यात कोणालाच विचारले नाही की समुद्र किती दूर आहे.

## पंचांग

**बुधवार, १३ मे, २०२०**
**शक १९४२ शार्वरीनामसंवत्सर**

*** वैशाख कृष्ण सप्तमी * नक्षत्र : श्रवण**

**रवी उदय- ०६-०६**
**रवी अस्त- १९-०४**



**जन्मराशी :**
**००-०१ ते २४-००**
**मकर**

**संत नामदेव महाराज पुण्यतिथी-घोराड, वर्धा; बुधाचे सायं. पश्चिमेस दर्शन, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुण्यतिथी (तिथीप्रमाणे)**

संपादक, मुद्रक, प्रकाशक व संचालकः **सौ.जयश्री खाडिलकर-पांडे**
मुद्रक-प्रकाशन स्थळ : नवाकाळ प्रेस, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगाव, मुंबई -४००००४. टेलिफोनः२३८८०९८१,
जाहिरात विभागः२३८६०९८७,२३८४१५२४,
फॅक्स नं.ः२३८१०१७६,वितरणः२३८२४४६६,
फॅक्स नं.ः२३८६०९८९,२३८७४९११.
**कार्यकारी संपादक : रोहित पांडे**
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

## कविता

### कोरोनावर मात करा ना

ताई, माई, दादा, काकी,
काका, मामा, मामी घरात बसा ना,
कोरोनावर मात करा ना,
कोरोनावर मात करा ना.....!!!

लॉकडाऊन सर्वांच्या आहे हिताचे,
देशाच्या , राज्याच्या सुरक्षिताचे,
मी माझा रक्षक बनून घरात बसा ना....
कोरोनावर मात करा ना...
कोरोनावर मात करा ना.....!!!

देशावर आले हे मोठे संकट ना,
होईल तुमचे, आमचे आर्थिक तोटे ना,
माझे काय होईल याचा विचार नका करू ना....
कोरोनावर मात करा ना...
कोरोनावर मात करा ना....!!

जीवन आहे हे अनमोल ना,
हा जन्म नाही पुन्हा ना,
आपल्या जीवाची, आपल्या परिवाराची काळजी घ्या ना...
कोरोनावर मात करा ना....
कोरोनावर मात करा ना....!!!

**सुदर्शन शांताराम जाधव**
चोरवणे, खेड



# एकाच ठिकाणी स्पर्धा घ्याव्यात-गोपीचंद



**कोरोना संकटाचा वाढता प्रादुर्भाव पाहता आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन महासंघाने भविष्यात एकाच ठिकाणी जास्तीत जास्त स्पर्धा आयोजित कराव्यात अशी सूचना भारतीय बॅडमिंटन संघाचे मुख्य प्रशिक्षक असलेल्या पी. गोपीचंद यांनी केली आहे. कोरोना संकटावर मात करण्याच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन महासंघाने काही नव्या उपाय योजना करणे आवश्यक असल्याचे गोपीचंद म्हणाले. खेळाडूंच्या आरोग्याचा विचार करून महासंघाने स्पर्धा नियोजन आणि वेळापत्रकात बदल करणे आवश्यक असल्याचे गोपीचंद याने स्पष्ट केले.**

■ नवी दिल्ली

**त्या** दृष्टीने सर्वात मोठा बदल जास्तीत जास्त स्पर्धा एकाच ठिकाणी कशा खेळवता येतील यांचा विचार महासंघाने जरूर करावा, जेणे करून खेळाडूंना स्पर्धांसाठी दर आठवड्याला वेगवेगळ्या देशात जायला लागणार नाही. सद्यस्थितीत प्रवास करणे धोकादायक आहे. त्यामुळे एकाच ठिकाणी स्पर्धा झाल्यास त्याचा सर्वांनाच लाभ होऊ शकतो, असेही गोपीचंद यांनी सांगितले.

वेगवेगळ्या तीन-चार देशात स्पर्धा खेळविण्याऐवजी एकाच देशात स्पर्धा झाल्यास आयोजनाच्या दृष्टीने देखील ते सोपे जाईल. खेळाडूंची देखील दमछाक होणार नाही. एकाच ठिकाणी जास्त दिवस खेळाडूला राहण्यास फारशी अडचण येणार नाही असेही गोपीचंद म्हणाले.

पुरुष एकेरी, महिला एकेरी, दुहरी आणि मिश्र दुहेरी या सर्व स्पर्धा घ्यायला काहीच हरकत नाही. प्रेक्षकांशिवाय सामने झाले तरी चालण्यासारखे आहे. पण कुठे तरी आता लवकर आंतरराष्ट्रीय सामन्यांना सुरुवात होणे महत्त्वाचे आहे. आंतरराष्ट्रीय सामने पुन्हा सुरू झाले तर बॅडमिंटन खेळाला आलेली मरगळ झटकली जाईल असा विश्वास देखील गोपीचंद यांनी व्यक्त केला.

## जॉर्ज पहिला

■ माद्रिद



**व्हर्चुएल** स्पॅनिश ग्रॅड प्रिक्स ऑन लाइन शर्यतीत विल्यम संघाचा चालक जॉर्ज रसेलने पहिला क्रमांक मिळविला. तर फेरारीच्या चार्विस डिकेटचा दुसरा क्रमांक लागला. मेक्सिकोच्या गुंझेरने तिसरा क्रमांक मिळविला. मँचेस्टर सिटीचा फुटबॉलपटू सर्जिओ, रियल माद्रिदचा गोलरक्षक क्लोशेस आणि बार्सिलोनाचा फुटबॉलपटू पेलोदेखील या शर्यतीत सहभागी झाले होते. विल्यम संघाचे प्रतिनिधित्व करताना मुळच्या ब्रिटनच्या असलेल्या जॉर्जला फॉर्म्युला वन मुख्य ग्राप्री शर्यतीत अद्याप एकही जेते पद मिळविता आलेले नाही. त्यामुळे या विजेते पदाने तो कमालीचा खूश झाला.

## भारताने ऑस्ट्रेलियाचा दौरा करावा-गौतम गंभीर

■ नवी दिल्ली

**भारतीय** क्रिकेट संघाने आपला नियोजित असलेला ऑस्ट्रेलियाचा क्रिकेट दौरा जरूर करावा आणि त्यासाठी बीसीसीआयने पुढाकार घ्यावा असे भारताचा माजी सलामीवीर आणि डावखुरा फटकेबाज फलंदाज गौतम गंभीरने सांगितले.



काहीच दिवसांपूर्वी बीसीसीआयचे खजिनदार धुमाळ यांनी भारताचा ऑस्ट्रेलियन दौरा नियोजित वेळेत झाल्यास खेळाडूंना विलगिकरणात ठेवता येईल, त्यासाठी १४ दिवस अगोदर भारतीय संघाला ऑस्ट्रेलियात जावे लागेल असे म्हटले होते. ऑस्ट्रेलियन दौऱ्याच्या दृष्टिने बीसीसीआय सकारात्मक विचार करते ही चांगली गोष्ट असल्याचे गंभीर म्हणाला. उभय देशात सामने झाले तर दोन्ही देशांमध्ये क्रिकेटच्या चांगल्या वातावरणाची निर्मिती होऊ शकते.

सध्याच्या वातावरणातून बाहेर येणे, जास्त गरजेचे आहे. भारत ठरल्याप्रमाणे आगामी नोव्हेबर-डिसेंबरमध्ये ४ कसोटी सामने खेळण्यासाठी ऑस्ट्रेलियाचा दौरा करणार आहे. हा दौरा रद्द झाल्यास ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघटनेला त्याचा मोठा आर्थिक फटका बसू शकतो याचाही विचार बीसीसीआयने करावा असेही गंभीर म्हणाला.

आयसीसी जागतिक कसोटी क्रमवारीत ऑस्ट्रेलियाने भारताला मागे टाकून प्रथमच अव्वल स्थानावर झेप घेतली. याबाबत गंभीरला विचारले असता त्याने आयसीसीची या क्रमवारी बाबतची प्रणाली चूकीची असल्याचे सांगितले. संघांना दिले जाणारे गुण देखील आपल्याला बरोबर वाटत नसल्याचे त्यांने स्पष्ट केले. वास्तविक देशात आणि विदेशात संघ जिंकल्यास दोन्ही ठिकाणी सारखेच गुण द्यायला हवेत अशी सूचना देखील गंभीरने केली.

## बास्केटबॉलपटू केव्हिन यंदा खेळणार नाही

■ न्युजर्सी

**एनबीए** या प्रसिद्ध अमेरिकन व्यवसायिक बास्केटबॉल स्पर्धेत ब्रुकलीन नेटस संघाचा आघाडी फळीतील स्टार खेळाडू केव्हिन डुरांट यंदा राहिलेल्या लढतीत देखील खेळणार नसल्याचे संघ व्यवस्थापनातर्फे सांगण्यात आले. दुखापतीतून तो पूर्णपणे



अद्याप सावरला नसल्यामुळे यंदाच्या मोसमात तो खेळण्याची शक्यता फार कमी असल्याचे संघ व्यवस्थापनातर्फे स्पष्ट करण्यात आले. गेल्या वर्षी जुलै महिन्यात गोल्डन स्टार संघाविरूद्ध खेळताना केविनला दुखापत झाली होती.

त्यानंतर तो बास्केटबॉल कोर्ट बाहेरच आहे. सध्या तो विश्रांती घेत आहे. गेल्या वर्षी त्याने गोल्डन स्टार संघाला गुडबाय करून ब्रुकलिन नेट संघात प्रवेश केला होता. त्याने ब्रुकलिन संघासोबत ४ वर्षाचा करार केला. त्यासाठी तब्बल १६४ मिलियन एवढी मोठी रक्कम केविनला देण्यात आली. २०१३-१४ च्या या स्पर्धेत तो सर्वोत्तम खेळाडू ठरला होता. तर दोन वेळा या स्पर्धेत अंतिम सामन्यात त्याने सर्वोत्तम खेळाडूचा मान मिळविला होता.


## नेशन चषक बुद्धिबळ स्पर्धेत चीन अजिंक्य

**चेन्नई- आंतरराष्ट्रीय** बुद्धिबळ महासंघाने आयोजित केलेल्या पहिल्या ऑन लाइन नेशन चषक आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत बलाढ्य चीन संघाने विजेते पदाचा मान मिळविला. निर्णायक लढतीत चीन आणि अमेरिका या दोन्ही संघाचे २ - २ असे समान गुण झाले. परंतु संपूर्ण स्पर्धेत चीनने जास्त गुण मिळविल्यामुळे त्यांना विजेते घोषित करण्यात आले. लिरेन - नाकामुरा यांच्यातील लढत ३८ चालीनंतर बरोबरीत सुटली.

त्यानंतर होऊ-एरिना ही लढत देखील बरोबरीत सुटली. तिसऱ्या सामन्यात यांगीने वेसलीला नमविले तर शेवटच्या लढतीत कारूआनाने सुरेख खेळी करताना चीनच्या बेइला पराभूत करून ही लढत बरोबरीत आणली. विशेष म्हणजे स्पर्धेतील पहिल्या टप्प्यात अमेरिकेने चीनवर विजय मिळविला होता. चीनला या स्पर्धेत प्रथम मानांकन देण्यात आले होते. भारताचा ५वा क्रमांक लागला.

## टेनिसपटू सानियाचा गौरव

■ हैदराबाद



**भारताची** नामवंत महिला टेनिसपटू सानिया मिर्झाला आंतरराष्ट्रीय टेनिस महासंघातर्फे दिला जाणारा 'फेड हार्ड कप' पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार मिळविणारी ती पहिली भारतीय खेळाडू ठरली.

आशिया-ओशियाना विभागात सानियाची निवड या पुरस्कारासाठी झाली आहे. ऑन लाइन पद्धतीने या पुरस्कारासाठी टेनिसपटू आणि टेनिसप्रेमींकडून मते मागविण्यात आली होती.

त्यामध्ये सानियाला १० हजारपेक्षा जास्त मते मिळाली आहेत. यंदा चार वर्षांच्या मोठ्या अवधीनंतर सानिया फेड चषक स्पर्धेत खेळली होती. विशेष म्हणजे भारताने यंदा प्रथमच या स्पर्धेची बाद फेरी गाठण्यात यश मिळविले.

आपल्याला मिळालेल्या पुरस्काराबद्दल सानियाने मत देणाऱ्या सर्वांचे आभार मानले आहेत. मिळणारी पुरस्काराची रक्कम ती तेलंगणा मुख्यमंत्री सहाय्यता निधीला देणार आहे.

## पॅरालिम्पिक ॲथलेट दीपा मलिक निवृत्त

■ रोहतक



**हरियाणाची** नामवंत पॅरालिम्पिक आंतरराष्ट्रीय ॲथलेट दीपा मलिकने या खेळातून आता निवृत्ती जाहीर केली आहे. लवकरच ती भारतीय पॅरालिम्पिक ॲथलेटिक संघटनेची अध्यक्षा होणार असल्यामुळे तिने निवृत्तीचा निर्णय घेतला आहे.

पॅरालिम्पिकमध्ये भारताला पहिले पदक दीपाने मिळवून दिले होते. २०१६च्या रियो येथे झालेल्या या स्पर्धेत दीपाने गोळा फेकमध्ये रौप्य पदक जिंकले होते. त्यानंतर आयपीसी स्पर्धेत देखील तिने पदके मिळविली होती. केंद्र सरकारचा राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार दीपाला मिळाला होता. गेली १९ वर्षे दीपाचा प्रवास व्हिलचेअरवरूनच सुरू आहे.

## कूकच्या सर्वोत्तम फलंदाजामध्ये विराट

■ लंडन

**इंग्लंड** क्रिकेट संघाचा माजी कर्णधार आणि सलामीचा डावखुरा फलंदाज ॲलिस्टर कूकने जाहीर केलेल्या आपल्या कसोटी सामन्यातील ५ सर्वोत्तम फलंदाजामध्ये भारतीय कर्णधार विराट कोहलीचा देखील समावेश केला आहे. या ५ सर्वोत्तम फलंदाजांमध्ये ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पॉटिंग, दक्षिण आफ्रिकेचा माजी कर्णधार जॅक कॅलिस, वेस्ट इंडिजचा माजी कर्णधार ब्रायन लारा आणि श्रीलंकेचा माजी कर्णधार कुमार संघकारा यांना कुकने स्थान दिले. विशेष म्हणजे कोहलीचा अपवाद वगळता इतर निवडलेले ४ फलंदाज हे आंतरराष्ट्रीय सामन्यातून निवृत्त झाले आहेत.

# नवाकाळ

मुंबई ■ बुधवार १३ मे, २०२० ■ पान- ८


### टॅक्सी आणि रिक्षावाले गावी परत जाऊ लागले

**मुंबई** - मुंबईत जवळजवळ २० हजार काली पिवळी टॅक्सी आणि साधारण दोन लाख रिक्षा आहेत. हे टॅक्सीवाले आणि रिक्षावाले मुंबईत थांबून वैतागून गेले आहेत. त्यांच्याकडचे पैसेही संपत आल्याने त्यांनी अखेर आपल्या गाड्या घेऊन घराची वाट धरली आहे.



| | एकूण रुग्ण | वाढलेले रुग्ण |
|---|---|---|
| जग | ४०,०६,२५० | ८८८९१ |
| भारत | ७०७५६ | ३६०४ |
| महाराष्ट्र | २३४०१ | १२३० |
| मुंबई | १४५२१ | ७८२ |
| पुणे | २४७६ | ९९ |
| औरंगाबाद | ४९१ | १६ |
| ठाणे | ९२७ | ४७ |

| | एकूण रुग्ण | वाढलेले रुग्ण |
|---|---|---|
| नवी मुंबई | ८९८ | ७२ |
| कल्याण डोंबिवली | ३६६ | १५ |
| वसई विरार | २४९ | २० |
| मालेगाव | ५९६ | ३४ |
| जळगाव | १४५ | १ |
| सोलापूर | २८७ | ४६ |
| सातारा | १२१ | २ |

## दारूच्या खरेदीसाठी आता ई-टोकन रांगा टाळण्यासाठी अनोखी योजना

■ मुंबई

**दारूच्या** दुकानाबाहेर होणारी गर्दी आणि कोरोनाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने आता अनोखी उपाययोजना आखली आहे. मद्य खरेदी करणाऱ्या ग्राहकांसाठी ई- टोकन सुविधा उपलब्ध केली आहे. या हायटेक योजनेमुळे मद्यप्रेमींचा रांगेत उभे राहण्याचा त्रास वाचणार आहे.

ही ई- टोकन सुविधा www.mahaexcise.com



या संकेतस्थळावर उपलब्ध असणार आहे . त्यासाठी मद्य खरेदी करणाऱ्या ग्राहकांनी या संकेतस्थळावर रजिस्ट्रेशन करून ई- टोकन घेणे आवश्यक आहे.

या संकेतस्थळावर ग्राहकाने आपला मोबाईल नंबर आणि नाव नमुद करायचे आहे. त्यानंतर आपला जिल्हा आणि पिनकोड नंबर नमूद करायचा आहे. त्यानंतर सबमिट बटनावर क्लिक करणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया पार पडल्यानंतर ग्राहकास आपल्या मद्यविक्री करणाऱ्या दुकानांची यादी मिळेल. त्यापैकी एका दुकानाची निवड केल्यानंतर विशिष्ट तारीख आणि वेळेची निवड ग्राहकास करता येईल. आवश्यक माहिती नमूद केल्यानंतर ग्राहकास ई- टोकन मिळणार आहे.त्या टोकन नुसार ग्राहकास त्या दुकानात जाऊन मद्य खरेदी करता येईल.

## शेअर बाजारात घसरण

■ मुंबई



**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांच्यासोबत झालेल्या देशातील सर्व मुख्यमंत्र्यांच्या झालेल्या बैठकीत महाराष्ट्र आणि पंजाबसह इतर काही राज्यांनी लॉकडाऊन वाढवण्याची मागणी केली आहे. त्यामुळे पंतप्रधानांनीही लॉकडाऊन वाढवण्याचे संकेत दिले आहेत.

परिणामी मुंबई शेअर बाजारात आज सकाळी घसरण झाली. त्यामुळे आठवड्याच्या पहिल्याच दिवशी मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ३९९ आणि निफ्टी १०४ अंकांनी मायनसमध्ये होते. तिसऱ्या टप्प्यातील लॉकडाऊन संपल्यानंतर तो चौथ्या टप्प्यात वाढवण्यात येणार आहे. त्याचा नकारात्मक परिणाम शेअर बाजारावर झाला आहे. त्यामुळे बाजारात आज सकाळच्या सत्रात मोठी घसरण झाली आहे.


वेदांता, टाटा मोटर, आयटीसी, सनफार्मा हे समभाग आज तेजीत होते. मात्र एचडीएफसी बँक, एशियन पेंट, एचडीएफसी, आयसीआयसीआय बँक आणि हिंदुस्तान युनिलिव्हर या कंपन्यांचे भाग आज तोट्यात होते.

## सुप्रीम कोर्टात ऐतिहासिक घटना प्रथमच एक सदस्यीय खंडपीठ सुनावणी

■ नवी दिल्ली

**सर्वोच्च** न्यायालयाच्या इतिहासात प्रथमच न्यायमूर्तींचे एक सदस्यीय खंडपीठ सुनावणी करणार आहे. ही सुनावणी उद्या बुधवार १३ मे पासून सुरू होणार आहे. मोठ्या प्रमाणात खटले प्रलंबित राहत असल्याने ही नवीन एक सदस्यीय पद्धती सुरू करण्यात आली आहे.

यापूर्वी सर्वसाधारणपणे सर्वोच्च न्यायालयात दोन



सदस्यीय खंडपीठासमोर सुनावणी होत असे. नव्या पद्धतीनुसार हे खंडपीठ ज्या गुन्ह्यात ७ वर्षापेक्षा जास्त कारावासाची शिक्षेची तरतूद नाही अशा गुन्ह्यासंदर्भातील जामीन, अटकपूर्व जामीनाबाबत सुनावणी करणार आहे.यापूर्वी असे खटले दोन सदस्यीय खंडपीठासमोर चालत होते.

गेल्या वर्षीच सप्टेंबर महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने नियमात सुधारणा करत एक सदस्यीय खंडपीठाला जामीन आणि अटकपूर्व जामीन तसेच बदली संदर्भातील खटल्यांवर सुनावणी करण्यास परवानगी दिली होती.

## बदलापुरात ट्रान्सफॉर्मरला आग वीज खंडित झाल्याने नागरिक हैराण

■ बदलापूर

**बदलापूरमध्ये** ट्रांसफॉर्मरला आग लागल्यामुळे या परिसराचा वीजपुरवठा खंडित झाला. त्यामुळे नागरिक उकाड्याने प्रचंड हैराण झाले. या आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले आहेत. बदलापूर पूर्वेकडील कात्रप भागातील विजेच्या ट्रान्सफॉर्मरचा स्फोट होऊन त्याला आग लागली. परिणामी बदलापूर पूर्व भागातील वीजपुरवठा खंडित झाला. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान आणि महावितरणचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी आग



आटोक्यात आणण्याचे काम सुरू केले आहे. यामुळे परिसराचा वीजपुरवठा खंडित झाला आहे.

त्यामुळे नागरिक हैराण झाले आहे. हा वीजपुरवठा पूर्ववत करण्याचे प्रयत्न महावितरणने सुरू केले आहेत. ऐन उकाड्यात ही घटना घामाघूम झालेल्या बदलापूरकरांना उकाड्याचा सामना करावा लागत आहे. शॉर्टसर्किटमुळे ही घटना घडली असावी, असा अंदाज महावितरणच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

## काश्मीरची ट्यूलिप गार्डन फुलली!१३ लाख फुले मात्र गार्डनमध्ये भेटायला एक पर्यटकही नाही!

■ श्रीनगर

**काश्मीरमधील** ट्यूलिप गार्डन हे जगभरातील पर्यटकांसाठी प्रचंड आकर्षणाचे ठिकाण आहे. यावर्षी या ट्यूलिप गार्डनमध्ये ५६ प्रकारची आणि वेगवेगळ्या रंगांची १३ लाख ट्यूलिप फुले फुलली आहेत. साक्षात जन्नत का नजारा असणाऱ्या या ट्यूलिप गार्डनला भेट द्यायला कोरोना महामारीच्या भीतीने घरात बसलेले पर्यटक घराबाहेर येतच नाहीत. त्यामुळे या ट्यूलिप गार्डनवर खर्च केलेले १०० कोटी रुपये वसूल होण्याची शक्यता धुसर होत चालली आहे. त्यामुळे जम्मू-काश्मिरचे प्रशासन चिंतेत आहे. संपूर्ण जगाला विळखा घातलेल्या कोरोना महामारीमुळे जीवाला घाबरलेले लोक घराबाहेर पडतच नाहीत. त्यामुळे यावर्षी हाताच्या बोटावर मोजणारे पर्यटक या ट्यूलिप गार्डनमध्ये येत आहेत.

निसर्गरम्य दल सरोवराच्या काठावर तयार करण्यात आलेल्या या ट्यूलिप गार्डनमध्ये गेल्यावर्षी ३,५०,००० देशी - विदेशी पर्यटक आले होते. यावर्षी किमान ४ लाख पर्यटक येतील, असे काश्मिरच्या पर्यटन विभागातर्फे देखभाल करणाऱ्या या ट्यूलिप गार्डनच्या प्रशासनाला वाटत होते. यावर्षी या ट्यूलिप



**१०० कोटी रुपये वसूल होण्याची शक्यता धुसर**

गार्डन मध्ये तब्बल एक लाख ट्युलिप फुले जास्त फुलविण्यात आली होती.

जपानच्या चेरी गार्डन च्या थीमवर यावर्षी हे ट्यूलिप गार्डन तयार करण्यात आले आहे. एवढेच नव्हे; तर ट्यूलिप गार्डनचे सौंदर्य आणखीन खुलून दिसावे म्हणून त्यात त्या बागेतून दल सरोवराच्या पाण्याचा एक कालवा खेळविण्यात आलेला आहे. काश्मिरच्या पर्यटन विभागातर्फे या ट्युलिप गार्डनची देखभाल केली जाते.

## इराणने आपल्याच जहाजावर क्षेपणास्त्र सोडले

■ तेहरान

■ **कमांडरसहित २० जवानांचा मृत्यू तर अनेक जखमी**

**इराणमध्ये** एक विचित्र पण गंभीर दुर्घटना घडली आहे. इराणने आपली युद्धनौका '' जमरान वरून आपल्याच देशाच्या एक जहाजावर क्षेपणास्त्र डागले. या अपघातात २० पेक्षा जास्त जवान मृत्युमुखी पडले तर अनेकजण जखमी झाले आहेत.

अनाडोलू या वृत्त संस्थेने ही माहिती दिली आहे. इराणने एक क्षेपणास्त्र चुकून कोरोनाक या जहाजावर सोडले. या जहाजावर इराणच्या नौदलात नुकतेच भरती झालेले ३० ते ४० जवान होते. या दुर्घटनेत कमांडरसहित २० जणांचा मृत्यू झाला, अनेक जखमी झाले.जखमींना नौदलाच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

दरम्यान, इराणच्या इस्लामिक रिव्हॉल्युशनरि गार्डस कॉर्पस ने ही मानवी चूक असल्याचे म्हटले आहे. यावर इराणच्या सैन्याने अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

## सेवाग्राम येथील ४५ डॉक्टर मुंबईला रवाना



**या चमूत २४ महिला व २१ पुरुष डॉक्टर आहेत**

■ मुंबई

**करोनाच्या** युद्धात जिकरीने लढणाऱ्या मुंबईच्या डॉक्टरांना सहकार्य करण्यासाठी सेवाग्राम येथील ४५ युवा डॉक्टरांचे पथक मुंबईला काल रवाना झाले. राज्याच्या वैद्यकीय शिक्षण खात्याच्या सचिवांनी केलेल्या विनंतीनंतर मुंबईच्या लढाईसाठी हे तरुण डॉक्टर सज्ज झाले.

या चमूत २४ महिला व २१ पुरुष डॉक्टर आहेत. हे सर्व विविध विद्याशाखेत पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकत आहेत. त्यांची पूर्वसंमती घेताना ते स्वत:च या सेवेसाठी आनंदाने तयार झाल्याचे महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. नितीन गगणे यांनी सांगितले.

या युवा डॉक्टरांच्या कार्याचे स्वरूप अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र मुंबईत कार्यरत डॉक्टरांना मदत म्हणून वेगवेगळ्या रुग्णालयात त्यांना पाठवले जाण्याची शक्यता आहे. सलग दोन महिन्यांपासून मुंबईतील डॉक्टर करोनाशी लढत आहेत. त्यांना सहकार्यासाठी या डॉक्टरांना पाचारण करण्यात आले आहे. मात्र विदर्भातील अन्य काही शासकीय महाविद्यालयांत पुरेसे मनुष्यबळ नाही. या पार्श्वभूमीवर सेवाग्रामच्या वैद्यकीय मनुष्यबळावर शासनाची भिस्त आहे. सेवाग्रामची ही वैद्यकीय संस्था करोना रुग्णालय म्हणून शासनाने घोषित केली आहे. तसेच दहा दिवसांपूर्वी या रुग्णालयातील प्रयोगशाळेस करोना तपासणी केंद्र म्हणून मान्यताही मिळाली आहे.

## वांगणीत कोरोनाचा शिरकाव शहरातील दुकाने आजपासून बंद

■ ठाणे

**ठाणे** जिल्ह्यात आणि शहरात कोरोनाने धुमाकूळ घातला असताना त्यापासून अलिप्त असलेल्या वांगणी शहरातही आता कोरोनाने शिरकाव केला आहे. त्यामुळे या शहरातील सर्व दुकाने आजपासून बंद करण्यात आली आहेत. यातून केवळ अत्यावश्यक सेवा आणि औषधांच्या दुकानांनाच वगळले आहे.

ठाणे शहर आणि परिसरात कोरोनाचा प्रसार झाला असला तरी वांगणी शहर त्यापासून आतापर्यंत वाचलेले होते. त्यामुळे येथील नागरिक निर्धास्त होते. परंतु आता या शहरातही कोरोनाचा



रुग्ण सापडला आहे. त्यामुळे शहरातील सर्व दुकाने आजपासून बंद करण्यात आली आहेत. वांगणीत सापडलेला हा कोरोनाचा रुग्ण भिवंडीत कामाला कामाला आहे. त्यामुळे तो रोज भिवंडीला जात-येत होता.

त्याला तेथेच लागण झाली असावी, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्याच्या संपर्कात आलेल्यांचा आरोग्य प्रशासन शोध घेत असून तो रहात असलेला परिसर पोलिसांनी सील केला आहे.

## बल्लारपूर स्थानकात रेल्वेगाडी बनली क्वारंटाईन सेंटर

**चंद्रपूर**- चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर स्थानकात २१ डब्यांच्या विशेष रेल्वेगाडीचे क्वारंटाईन सेंटर बनवण्यात आले असून यातील ११ डबे चंद्रपूर जिल्ह्यासाठी राखीव ठेवण्यात आलेले आहेत. एका डब्यात ९ संशयितांच्या विलगीकरणाच्या सुविधेची उभारणी करण्यात आली आहे. राज्य आणि देशात कोरोनाबाधितांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत आहे. याचा मुकाबला करताना जिल्हा प्रशासनाने विविध ठिकाणी संस्थात्मक विलगीकरणासाठी विविध पर्याय तयार ठेवले आहेत. मात्र, हे पर्याय अपुरे पडल्यास आता चंद्रपूर जिल्ह्याच्या मदतीला भारतीय रेल्वे धावून आली आहे. एकूण ९९ संशयितांना या ११ डब्यांमध्ये हे सामावून घेतले जाऊ शकते.

## फॉर्म जी स्वारस्याच्या अभिव्यक्तीचे आमंत्रण

(इन्सॉल्हेन्सी अॅन्ड बँकरप्ट्सी (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता परिसमापन ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ ए(१) अंतर्गत)

**संबंधित विवरण**

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट ऋणकोची संस्थापन दिनांक | ०१ एप्रिल १९९२ |
| ३. | कॉर्पोरेट ऋणको संबंधित/नोंदणीकृत असलेले प्राधिकारी | कॉर्पोरेट कामकाज मंत्रालय, आरओसी, मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट आयडेंटिटी नंबर/लिमिटेड लाएबिलिटी आयडेंटिफिकेशन नंबर | L99999MH1992PLC066213 |
| ५. | कॉर्पोरेट ऋणको च्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता व मुख्य कार्यालय (काही असल्यास) | नोंदणीकृत कार्यालय : सिरोया सेंटर, सहार एअरपोर्ट मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९९. प्रधान कार्यालय : जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड, ग्लोबल वन, ३ रा मजला, २५२, एलबीएस मार्ग, कुर्ला (पश्चिम), मुंबई - ४०० ०७१. |
| ६. | कॉर्पोरेट ऋणको ची दिवाळखोरी प्रारंभ दिनांक | २० जुन २०१९ |
| ७. | स्वारस्याच्या अभिव्यक्तीचे आमंत्रण दिनांक | १३ मे २०२० (४ थी फेरी). वर्तमानपत्रांत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे तसेच कंपनी वेबसाइटवरही अद्ययावत करण्यात आलेली आहे. |
| ८. | संहितेच्या अनुच्छेद २५ (२) (एच) अंतर्गत ठराव अर्जांकरिताची पात्रता उपलब्धता : | पात्रता अर्हता **www.jetairways.com.** वर उपलब्ध विस्तृत स्वारस्याच्या अभिव्यक्तीमध्ये विहित आहे किंवा ती **fly.JetAirways@in.gt.com** येथे ई-मेल पाठवून प्राप्त करता येऊ शकेल. |
| ९. | अनुच्छेद २९ ए अंतर्गत लागू अपात्रतेचे निकषः | आयबीबीआयची वेबसाइट **http://ibbbi.gov.in/legal_framework.php** वर उपलब्ध आहे किंवा ते **fly.JetAirways@in.gt.com** येथे ई-मेल पाठवून प्राप्त करता येऊ शकतील. |
| १०. | स्वारस्याच्या अभिव्यक्तीच्या स्वीकृतीची अंतिम तारीख | दि. २८.०५.२०२० |
| ११. | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती सूची जारी होण्याची तारीख | दि. ०२.०६.२०२० |
| १२. | तात्पुरत्या सूचीकरिता हरकती सादर करण्याची अंतिम तारीख | दि. ०७.०६.२०२० |
| १३. | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम सूची जारी होण्याची तारीख | दि. १०.०६.२०२० |
| १४. | संभाव्य ठराव अर्जदारांसाठी माहितीचे ज्ञापन, मूल्यांकन निकष तसेच ठराव आराखड्याची विनंती सादर करण्याची तारीख | दि. ०२.०६.२०२० |
| १५ | ठराव आराखडा, मूल्यांकन निकष, माहिती ज्ञापन व पुढील माहिती प्राप्त करण्याच्या विनंतीचे स्वरूप | सक्षम प्रस्तावित ठराव अर्जदारांना इलेक्ट्रॉनिक स्वरूपात पुरविण्यात येईल. |
| १६ | ठराव आराखडा सादर करण्याची अंतिम तारीख | दि. ११.०७.२०२० |
| १७ | ठराव अधिकाऱ्यांकडे ठराव आराखडा सादर करण्याचे स्वरूप | मोहोरबंद लिफाफ्यातून टपाल/हातबटवड्याद्वारे तसेच ठराव अधिकाऱ्यांना पेन ड्रॉव्हमधून डिजिटल प्रतही देण्यात येईल. |
| १८ | मंजुरीकरिता निर्णय अधिकाऱ्यांकडे ठराव आराखडा सादर करण्याची अंदाजित दिनांक | दि. २३.०७.२०२०. |
| १९. | ठराव अधिकाऱ्यांचे नाव व नोंदणीकरण क्रमांक | आशिष चवचारिया **IBBI/IPA-001/IP-P00294/2017-18/10538** |
| २०. | बोर्डकडे नोंदणीकरण केल्यानुसार ठराव अधिकाऱ्यांचे नाव, पत्ता व ई-मेल | आशिष चवचारिया पत्ता : ग्रॅन्ट थॉरन्टन, १० सी हंगरफोर्ड स्ट्रीट, कोलकाता - ७०० ०१७. ई-मेल : **ashish.chhawchharia@in.gt.com** |
| २१. | ठराव अधिकाऱ्यांकडे पत्र व्यवहार करावयाचा पत्ता व ई-मेल | जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड, सिरोया सेंटर, सहार एअरपोर्ट रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९९. ई-मेल : **fly.jetAirways@in.gt.com** |
| २२. | पुढील तपशील उपलब्ध असण्याचे वा प्राप्त करण्याचे ठिकाण | कॉर्पोरेट ऋणकोंची वेबसाइट **www.jetairways.com** किंवा **fly.jetAirways@in.gt.com** येथे ई-मेल पाठवून प्राप्त करता येऊ शकेल. |
| २३. | फॉर्म जी प्रसिद्धी दिनांक | १३.०५.२०२० (४ थी फेरी) |

सही/-
**आशिष चवचारिया, ठराव अधिकारी**
**(IBBI/IPA-001/IP-P00294/2017-18/10538)**
**जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेडचे ठराव अधिकारी**
ई-मेल **RP.JetAirways@in.gt.com**
आयबीबीआयकडे नोंदणीकृत पत्ता व ई-मेल आयडी :
ग्रॅन्ट थॉरन्टन, १० सी हंगरफोर्ड स्ट्रीट, कोलकाता - ७०० ०१७.
ई-मेल : **ashish.chhawchharia@in.gt.com**

दिनांक : १३ मे, २०२०
ठिकाण : मुंबई

## औरंगाबादमध्ये कोरोनाचे ६२६ रुग्ण

■ औरंगाबाद

**औरंगाबादमध्ये** करोनाबाधितांची संख्या दिवसागणिक वाढतच आहे. सोमवारी रात्रीपर्यंत जिल्ह्यातील करोनाबाधितांची संख्या ६२७ वर पोहचल्याचे प्रशासनाने सांगितले.

औरंगाबाद शहरात सोमवारी संध्याकाळी सात करोनाबाधितांची भर पडल्याने जिल्ह्यातील रूग्णांची संख्या ६२७ झाल्याचे मिनी घाटी प्रशासनाने सांगितले आहे. या रूग्णांमध्ये जुना मोंढा, भवानी नगरमधील एक, जुना बाजार येथील चार आणि बेगमपुरातील दोन कोरोनाबाधित आहेत. तर शहरातील मनपाच्या किलेअर्क येथून ३६ जण बरे होऊन घरी गेले आहेत. आतापर्यंत औरंगाबाद जिल्ह्यातील ११३ करोनाबाधित कोरोनामुक्त झाल्याचेही यावेळी प्रशासनाने सांगितले आहे. औरंगाबाद शहरात गेल्या आठ दिवसांपासून सरासरी करोनाबाधितांचा आकडा १५ ते १७ असा येत आहे.

## रेशन कार्डच्या नियमामध्ये बदल

■ मुंबई

**केंद्र** सरकारने रेशन कार्डसंबंधी एका नियमात बदल केला आहे. सरकारच्या या निर्णयाचा फायदा कोट्यवधी लाभार्थ्यांना मिळण्याची शक्यता आहे. रेशन कार्डाला आधार क्रमांकाशी जोडण्याची अंतिम तारीख पुढे ढकलण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. आता सप्टेंबरपर्यंत रेशन कार्डाला आधार क्रमांकाला जोडण्याची मुदत वाढवण्यात आली आहे.

सोमवारी सरकारने यासंदर्भातील निर्णय जाहीर केला. तसेच आधार क्रमांक जोडला नसेल तरी रेशन कार्डधारकाला धान्य मिळत राहणार असल्याचेही सरकारने सांगितले. रेशन कार्डाला आधार क्रमांक न जोडल्यास रेशन कार्ड रद्द करण्यात येण्याच्या वृत्तावर स्पष्टीकरण देताना सरकारने ही माहिती दिली.

## कराडात एकाच दिवशी ११ रुग्णांना डिस्चार्ज

**कराड**- सातारा जिल्ह्यातील कोरोनाचे हॉट स्पॉट बनलेल्या कराड तालुक्यात काल सर्वांना दिलासा देणारी घटना घडली. काल कृष्णा रुग्णालयातून एकाच दिवशी ११ रुग्णांना डिस्चार्ज देऊन घरी पाठवले. यापूर्वी याच रुग्णालयातून चिमुकल्यासह १२ जणांना डिस्चार्ज दिला होता. कराड तालुक्यातील कोरोनाबाधितांची एकूण संख्या ८७ आहे. त्यापैकी या रुग्णालयातून आतापर्यंत २३ जणांना डिस्चार्ज देण्यात आला आहे.

## यवतमाळमध्ये आणखी १२ जणांना डिस्चार्ज

■ यवतमाळ

**यवतमाळमधील** वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या आयसोलेशन वॉर्डात भरती असलेल्या १२ कोरोनाबाधित रुग्णांचे कोरोना अहवाल निगेटिव्ह आल्यामुळे त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. मात्र, प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून पुढील १४ दिवस त्यांना आरोग्य पथकाच्या देखरखीखाली गृह विलगीकरणात ठेवण्यात येईल.

गेल्या तीन दिवसांत एकूण ३४ जण 'पॉझेटिव्ह टू निगेटिव्ह' होऊन घरी गेले आहेत. गत २४ तासात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला ५१ रिपोर्ट प्राप्त झाले. यापैकी दोन जणांचा रिपोर्ट नव्याने पॉझिटिव्ह आल्याने रुग्णांची संख्या ६३ वरून ६५ वर गेली. मात्र, सोबतच १२ जणांचे रिपोर्ट १४ दिवसांच्या कालावधीनंतर निगेटिव्ह आल्याने त्यांना सुट्टी देण्यात आली. त्यामुळे सद्यस्थितीत आयसोलेशन वॉर्डात ५३ अॅक्टीव पॉझिटिव्ह रुग्णांसह एकूण ६२ जण भरती आहेत.


**पश्चिम रेल्वे**

**रेल्वे क्वार्टर्सचे इलेक्ट्रिकल रिवायरिंग**

**निविदा सूचना क्र. व दिनांक :** EL 81/766/WA/2, Dated : १२.०५.२०२० **कामाचे वर्णन :** मुंबई विभाग - इलेक्ट्रिकल रिवायरिंग व वीजपुरवठा प्रणालीच्या बळकटीकरणाद्वारे रेल्वे क्वार्टर्सची सुधारणा. **अंदाजित मूल्य :** ₹ २,२७,५१,८१०.००, **इरठेचे मूल्य :** ₹ २,६३,८००.००, **सादरीकरणाची तारीख व वेळ :** दि. १२.०६.२०२० रोजी दु. १५.०० पर्यंत, **उघडण्याची तारीख व वेळ :** दि. १२.०६.२०२० रोजी दु. १५.३० वा. निविदा दस्तावेज, शुद्धिपत्रक डाउनलोड करणे व पुढील तपशिलाकरिता कृपया आमची वेबसाइट **www.ireps.gov.in** ला भेट द्या. 03

आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly